कृषीवल
रायगड, सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६
किंमत ४ ₹

## लाचखोर तलाठ्यावर गुन्हा दाखल

**रायगड :** जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर फेरफार नोंद करून देण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच मागितल्याचा गंभीर आरोप पेण तालुक्यातील तलाठी सचिन सीताराम घुमाड (३५) यांच्यावर करण्यात आला असून, याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पेण येथे अधिकृत तक्रार दाखल झाल्यानंतर प्राथमिक चौकशीत आरोपात तथ्य आढळून आले आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्याविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आल्याने महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत अधिक माहितीनुसार, तक्रारदाराच्या मालकीच्या मौजे कांदळे, पेण येथील सर्व्हे नं. ८९ जमिनीबाबत ७/१२ उताऱ्यात फेरफार नोंद करण्यासाठी संबंधित पान २ वर

गार्डनमध्ये काम करण्यासाठी अपंग व्यक्ती व महिला पाहिजेत
शिक्षित महिला पाहिजेत.
पात्रता – B.com, Computer
अर्जासह भेटा साई-इन रिसॉर्ट, चोंढी, रेवस रोड, अलिबाग

# आचारसंहितेचा भंग

**|| शेकाप सरचिटणीस जयंत पाटील सत्ताधाऱ्यांवर कडाडले || मतांसाठी पैशांचे आमिष दाखविण्याचा आरोप**

| पनवेल | प्रतिनिधी |

निवडणुकीच्या काळात सरकारी तिजोरीतून लाडक्या बहिणींना पैसे वाटप करुन त्यांना आमिष दाखविण्यात येत आहे. हा आदर्श आचारसंहितेचा भंग आहे, असा आरोप शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केला. निवडणुकीनंतर ही योजना बंद करण्याचा सरकारचा डाव आहे, असा दावाही जयंत पाटील यांनी केला. निवडणूक काळात आम्हाला बँकेतून कर्ज वाटप करुन देत नाहीत, परंतु दुसरीकडे मतांसाठी सरकारी तिजोरीवर डल्ला मारतात, त्याला आमचा आक्षेप आहे, असेही पाटील म्हणाले. त्यामुळे आदर्श आचारसंहितेचा यांनी अभ्यास केला आहे की नाही, असा सवाल पाटील यांनी उपस्थित करत सरकारच्या धोरणावर टीका केली.



पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचारादरम्यान रविवारी (दि. ११) आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी आ. बाळाराम पाटील, आर.सी. घरत, काशिनाथ पाटील, नारायण घरत, शिरीष घरत आदी मान्यवर उपस्थित होते.

जयंत पाटील म्हणाले की, निवडणुकीनंतर आमचे उमेदवार कुठेही जाणार नाहीत; जे तिकडे गेले आहेत, ते पूर्वी आमचेच होते. शेतकरी कामगार पक्ष ही कार्यकर्ता घडविणारे विद्यापीठ असून, अनेक कार्यकर्ते आम्ही घडविल्याचा अभिमान आहे. तरुण कार्यकर्ता हीच आमची ताकद आहे. या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेससह महाविकास आघाडीतील सर्व पक्षांचे कार्यकर्ते एकीचे बळ दाखवून चांगले काम करतील, असा विश्वास जयंत पाटील पान २ वर

### पैशांचा वारेमाप वापर : सपकाळ

निवडणुकीच्या आधी विरोधकांचा प्रचार थांबवण्यासाठी आणि मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी पैशांचा वारेमाप केला गेला आहे, असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपवर केला. सपकाळ म्हणाले की, मतदान यादीत दुबार मतदार असलेल्या नावासमोर स्टार लावण्यात येईल, असे निवडणूक आयोगाने ठरवले होते, परंतु त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. नगरपरिषद निवडणुकीच्या आदल्या दिवशी पैसे वाटप आणि बोगस मतदान घडल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांनी सांगितले की, या प्रकरणात शिवसेना (एकनाथ शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचेही साथ आहे. सपकाळ म्हणाले, जर ही परिस्थिती अशीच राहिली, तर भारतात बांगलादेश आणि श्रीलंकेसारखी राजकीय परिस्थिती निर्माण होऊ शकते.

# भाजपकडून गुंडाला उमेदवारी

- उमेदवारावर विनयभंगासह गंभीर गुन्हे
- कामोठे प्रभाग ११ (क) मधून चरणजित सिंग उर्फ ‘हॅपी’ला उमेदवारी

| अलिबाग | प्रतिनिधी |

बाल लैंगिक अत्याचार प्रकरणातील सहआरोपीला बदलापूर कुळगाव नगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक केल्याच्या प्रकरणावरून अवघ्या २४ तासांत राजीनामा घ्यावा लागलेल्या भाजपवर टीकेची झोड उठलेली असतानाच, आता पनवेल महानगरपालिकेतही विनयभंगासह विविध गंभीर गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तीस उमेदवारी दिल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. कामोठे प्रभाग क्रमांक ११ (क) मधून भाजपने चरणजित सिंग उर्फ ‘हॅपी’ याला उमेदवारी दिल्याने भाजप हा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना पाठीशी घालणारा पक्ष असल्याची जोरदार टीका होत आहे.

कामोठे प्रभाग क्रमांक ११ (क) मधून हॅपी सिंगला उमेदवारी देत भाजपने महिलांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर केलेल्या सर्व घोषणा स्वतःच पायदळी तुडवल्याचा आरोप होत आहे. २०१७ मध्ये भाजपकडून निवडून आलेले आणि पक्षाशी निष्ठावान असलेले गोपीनाथ भगत या स्थानिक मराठी उमेदवाराला बाजूला सारून, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला पुढे आणणे हा प्रशांत ठाकूर यांच्या ‘पॉवर पॉलिटिक्स’चा भाग असल्याचे पान २ वर



### राजकीय नैतिकतेची राखरांगोळी

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या राजकीय छत्रछायेखाली गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचे पुनर्वसन सुरू असल्याचा गंभीर आरोप पुन्हा एकदा पुढे आला आहे. महिलांवरील विनयभंग, दंगल, जीवे मारण्याचा प्रयत्न यासह अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेल्या चरणजित सिंग उर्फ ‘हॅपी’ याला भाजपकडून आ. ठाकूरांच्या शिफारसीवरुन पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत उमेदवारी देऊन राजकीय नैतिकतेची अक्षरशः राखरांगोळी केली आहे. अशा गुंडाला पनवेलची जनता थारा न देता चांगलाच धडा शिकवेल, अशी चर्चा जोरात आहे.

## वे|ध|क

### जि.प., पं.स. निवडणूक मंगळवारी सुनावणी

**मुंबई :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या अनुषंगाने दाखल करण्यात आलेल्या महत्त्वाच्या याचिकांवरील सुनावणी मंगळवार (दि १२) जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात होणार असून, या सुनावणीनंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे भविष्य ठरणार आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी सर्वच पक्ष तयारीला लागले असून, मोर्चेबांधणीला वेग आला आहे. इच्छुक उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून आहे. त्यामुळे मंगळवारच्या सुनावणीनंतर सर्व चित्र स्पष्ट होणार आहे.

### आत्महत्येप्रकरणी पतीविरोधात गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** पत्नीने केलेल्या आत्महत्ये प्रकरणी पती विरोधात ६ जानेवारी रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तुषार महादेव पाटील हे दहिवली, सोमाटणे येथे राहत असून त्यांची मुलगी मोनाली हीचे लग्न सुरज प्रकाश नाईक (आर ३, करंजाडे) यांच्यासोबत झाले. मात्र तिचा सासरी छळ होत असल्याचे तिच्या वडिलांचे म्हणणे आहे. मोनालीला मुलगा झाला नाही या कारणावरून तिला वारंवार मानसिक व शारीरिक त्रास दिला जात असे. त्यामुळे ७ डिसेंबर रोजी मोनालीने गळफास घेऊन आत्महत्या केली.

### लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**नवीन पनवेल :** ४१ वर्षीय महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी मंगेश विश्वनाथ नेने (रा. नेणेपाडा, पेण) याच्याविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ४१ वर्षीय महिला नवी मुंबईमध्ये राहात असून, मंगेश नेने यांनी तिला लग्न करण्याचे आमिष दाखवले आणि नवी मुंबईतील विविध ठिकाणी येऊन शरीरसंबंध प्रस्थापित केले आणि लग्नाचा खोटा बनाव करून फसवणूक केली.

## नेरळच्या राजमाता जिजामाता तलाव परिसरात अघोरी विद्येचा प्रकार

**सार्वजनिक ठिकाणच्या प्रकाराने खळबळ**

| नेरळ | संतोष पेरणे |

नेरळ गावातील एकमेव आणि महत्त्वाचे मनोरंजनाचे ठिकाण असलेल्या राजमाता जिजामाता तलाव परिसरात अघोरी विद्येचा संशयास्पद प्रकार उघडकीस आला असून, यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. १० जानेवारीच्या रात्री हा प्रकार करण्यात आल्याचा अंदाज असून, सार्वजनिक व कायम गर्दी



असलेल्या ठिकाणी असा प्रकार घडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

नेरळ ग्रामपंचायत कार्यालयाच्या बाजूला असलेल्या राजमाता जिजामाता पान २ वर

## मालमत्ता करात ६५ टक्के दिलासा देणार

**माजी आमदार बाळाराम पाटील यांचे आश्वासन**

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महापालिकेच्या हद्दीतील सिडको वसाहतींमधील हजारो मालमत्ताधारकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९(अ)ची अंमलबजावणी न झाल्याने मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. मात्र, भविष्यात जनतेने संधी दिल्यास पनवेलकरांना मालमत्ता करात तब्बल ६५ टक्के सवलत मिळवून देण्याचे ठोस आश्वासन



महाविकास आघाडीचे नेते व माजी आमदार बाळाराम पाटील यांनी दिले आहे.

कळंबोली येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना बाळाराम पाटील म्हणाले की, शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार लागू असलेले कलम १२९ (अ) पनवेल महापालिका प्रशासनाने पान २ वर

## अलिबागच्या हवेवर प्रदूषणाचे सावट

**हवा गुणवत्ता निर्देशांक ‘वाईट’ श्रेणीत**

| रायगड | प्रतिनिधी |

कोकणातील प्रमुख पर्यटनस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अलिबाग शहरावर सध्या प्रदूषणाचे गंभीर संकट ओढावले आहे. अलिबागमधील हवा गुणवत्ता निर्देशांक ‘वाईट’ श्रेणीत नोंदवला गेला आहे. ‘वेदर डॉट कॉम’च्या माहितीनुसार, हा निर्देशांक २२५ पर्यंत पोहोचला होता, तर ‘एमएसएन वेदर रिपोर्ट’वर तो २१९ दर्शवण्यात आला आहे.

अलिबागमध्ये आर्द्रतेचे प्रमाण अधिक असल्यामुळे हवेत प्रदूषक



घटक साचून राहतात. त्यातच शहर आणि परिसरात सुरू असलेली मोठ्या प्रमाणावरील बांधकामे, रस्त्यांची कामे तसेच औद्योगिक प्रकल्पांतून होणारे पान २ वर

### हवा प्रदूषण वाढल्यास घ्यावयाची काळजी

प्रदूषणामुळे श्वसनसंस्थेचे व त्वचेशी संबंधित आजार उद्‌भवू शकतात. सकाळी व सायंकाळी धुरक्याचे प्रमाण अधिक असल्याने त्या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे. गर्दीच्या ठिकाणी जाणे शक्यतो टाळावे. थंड पेये व तेलकट पदार्थांचे सेवन करू नये. लहान मुले, वयोवृद्ध व आजारग्रस्त व्यक्तींनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

## रोहा शिंदे गटात राजकीय भूकंप

- तालुकाप्रमुख मनोज शिंदेंचा राजीनामा
- ‘हम करेसो’ कारभाराविरोधात डागली तोफ

| रोहा | प्रतिनिधी |

शिवसेना (शिंदे गट) रोहा तालुक्यात मोठा राजकीय भूकंप झाला असून, तालुका प्रमुख मनोज कुमार शिंदे यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. उमेदवारी नाकारल्याने आपला अपमान झाल्याची भावना व्यक्त करत त्यांनी पक्षातील ‘हम करेसो’ आणि एकाधिकारशाही निर्णयप्रक्रियेवर थेट आरोप केला आहे. तसेच त्यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्याकडे आपला राजीनामा सुपूर्द केला.

गेल्या अनेक वर्षांपासून पक्षासाठी निष्ठेने काम करत रोहा तालुक्यात संघटन मजबूत करण्यात मोलाचे योगदान दिल्यानंतरही स्थानिक कार्यकर्त्यांचे मत डावलले जात असल्याचा आरोप शिंदे यांनी केला. तळागाळातील कार्यकर्त्यांना पान २ वर




## राजिप शाळेच्या विद्यार्थ्यांना इस्रोभेटीची संधी

- सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी १३ जानेवारीला विज्ञान परीक्षा

| रायगड | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग प्राथमिक यांच्यातर्फे राष्ट्रीय आविष्कार अभियान सन २०२५-२०२६ राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशनला (इस्रो) भेट देता येणार आहे. यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये मंगळवारी (दि. १३) विज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षेत प्राविण्य मिळविलेल्या एकूण ४५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. त्यामुळे या संधीचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग प्राथमिक यांच्यातर्फे राष्ट्रीय आविष्कार अभियान सन २०२५-२०२६ राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत निवडक विद्यार्थ्यांना राज्यांतर्गत व राज्याबाहेरील अभ्यास भेट हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पान २ वर


### एकूण ४५ विद्यार्थ्यांची होणार निवड

जिल्हास्तरावर निवड झालेल्या प्रथम तीन मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा शाळांमधील प्रत्येकी ६ असे १८ विद्यार्थी निवडले जातील. तसेच उर्वरित शाळांमधील २७ विद्यार्थी अशा एकूण ४५ विद्यार्थ्यांची अभ्यास भेटीकरिता निवड करण्यात येणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या परीक्षेत आवर्जुन सहभाग घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले आहे.



# मुरुड किनाऱ्यावर खासगी फ्लोटिंग जेट्टीला परवानगी

## सागरी सुरक्षेचा गंभीर प्रश्न



| अलिबाग | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील कोलमांडला गावात, राखीव वनक्षेत्रालगत आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील असलेल्या समुद्रकिनाऱ्यावर खासगी व्यक्तीस तात्पुरती फ्लोटिंग जेट्टी (तरंगती जेट्टी) उभारण्यास महाराष्ट्र सागरी मंडळाने (मेरिटाइम बोर्ड) परवानगी दिल्याने मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, या परवानगीत वन विभाग, पोलीस, कोस्टगार्ड आणि कस्टम विभागाची आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे प्रत्यक्षात न घेताच केवळ रु. ११ हजार ८०० इतकी नाममात्र फी आकारून एनओसी देण्यात आल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत आणि कोलमांडला येथील नागरिक प्रतिक प्रमोद कणगी यांनी केला आहे. ही बाब माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागवलेल्या माहितीतून समोर आली असून, यामुळे पर्यावरणासह सागरी आणि राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

प्रतिक कणगी यांनी फेब्रुवारी २०२१ पासून कोलमांडला येथील प्रस्तावित फ्लोटिंग जेट्टीसंदर्भात सविस्तर माहिती मागवली होती. त्यावर मेरिटाइम बोर्डाने २३ मे २०२५ रोजी दिलेल्या उत्तरानुसार, १७ नोव्हेंबर २०२४ रोजी निसार हुसेन हान्सोजी यांना गट क्रमांक ४९ व ५० येथील जागेवर खासगी फ्लोटिंग जेट्टी किंवा बोट डॉक उभारण्यासाठी एनओसी देण्यात आली आहे. या एनओसीवर मेरिटाइम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माणिक सुरसळ यांची स्वाक्षरी असून, त्यास २१ अटी व शर्ती लागू करण्यात आल्या आहेत. संबंधित जागा समुद्रकिनाऱ्यालगत असून, राखीव वनक्षेत्राच्या अगदी जवळ असल्याचे प्लॉट रिपोर्ट व सॅटेलाइट प्रतिमांवरून स्पष्ट होते. मात्र, एनओसीमध्ये वन विभागाची परवानगी आवश्यक असल्याचा स्पष्ट उल्लेख असतानाही ती प्रत्यक्षात घेतली नसल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे.

मुरुड-श्रीवर्धन किनारा हा देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील मानला जातो. १९९३ च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोटांमध्ये याच परिसरातील किनाऱ्यांवरून आरडीएक्स आणि स्फोटके उतरवण्यात आल्याचा इतिहास असून, हा मुद्दा उपस्थित करत सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी गृह विभागाच्या अखत्यारीतील मेरिटाइम बोर्डाने हा काळा इतिहास विसरला आहे का, असा थेट सवाल उपस्थित केला आहे. अशा ठिकाणी खासगी व्यक्तीस जेट्टी उभारण्यास परवानगी देणे धोकादायक असून, भविष्यात गंभीर परिणाम होऊ शकतात, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

या प्रस्तावित जेट्टीमुळे पर्यावरणीय संतुलन बिघडण्याची, स्थानिक मच्छिमारांच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची तसेच सागरी सुरक्षेला धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. सावंत आणि कणगी यांनी याप्रकरणी गृहमंत्री तसेच पर्यावरण विभागाकडे तक्रार करण्याची तयारी दर्शवली असून, गरज भासल्यास जनहित याचिकेद्वारे न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही दिला आहे. दरम्यान, मेरिटाइम बोर्डाने माहिती अधिकारात दिलेल्या उत्तरात एनओसी तात्पुरती असून, ती प्रादेशिक बंदर अधिकाऱ्यांच्या शिफारशीवर आधारित असल्याचे नमूद केले आहे. मात्र, या गंभीर आरोपांवर मेरिटाइम बोर्डाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

# पनवेल आगारातील पानपोई बंद

## प्रवाशांची पाण्यासाठी फरफट



| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल एस.टी. बस डेपोमध्ये नागरिकांसाठी असलेली पानपोई गेल्या एक महिन्यापासून बंद अवस्थेत असून, याचा मोठा फटका प्रवासीवर्गाला बसत आहे. डेपोतील पाण्याच्या पंपाला जोडलेल्या वीज लाईन्स खराब झाल्यामुळे पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे. परिणामी, रोज शेकडो प्रवाशांना पिण्याचे पाणी विकत घेऊन तहान भागवावी लागत आहे.

उन्हाळ्याची सुरुवात झाली असताना पानपोई बंद राहणे ही गंभीर बाब असून, ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, मागील वेळी परिवहन सेवेचे मंत्री पनवेल दौऱ्यावर आले असताना पानपोई सुरू होती, मात्र त्यानंतर पुन्हा दुर्लक्ष झाले आहे. प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करून पानपोई सुरू करावी, अशी मागणी संतप्त प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

पनवेल एस.टी. बस डेपो हा कोकण, पुणे, मुंबई तसेच नवी मुंबईकडे जाणाऱ्या हजारो प्रवाशांचा प्रमुख केंद्रबिंदू आहे. दररोज पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत मोठ्या प्रमाणावर प्रवासी ये-जा करत असतात. अशा ठिकाणी मूलभूत सुविधा असलेली पानपोई बंद राहणे हे एस.टी. प्रशासनाच्या दुर्लक्षाचे स्पष्ट उदाहरण मानले जात आहे. प्रवाशांनी वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नसल्याचे चित्र आहे. काही प्रवाशांनी खासगी पाणी विक्रेत्यांकडून महागडे बाटलीबंद पाणी खरेदी करण्याशिवाय पर्याय नसल्याचे सांगितले. उन्हाळ्यात उष्णतेचा पारा वाढत असताना पिण्याच्या पाण्याअभावी प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

एस.टी. महामंडळ व संबंधित विभागाने तातडीने वीज लाईन दुरुस्ती करून पानपोई सुरू करावी, तसेच पर्यायी स्वरूपात पाणी टँकर किंवा तात्पुरती व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी नागरिक व प्रवासी वर्गाकडून होत आहे. संबंधित प्रशासन काय उपाययोजना करते, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

# ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार

| अलिबाग | प्रतिनिधी |



जनता शिक्षण मंडळाचे, ॲड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ, अलिबाग येथे विधीतरंग २०२६ या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन आणि माजी विद्यार्थी सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. ॲड. गौतम पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी संस्थेच्या उपाध्यक्षा मा. डॉ. साक्षी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे, महाविद्यालयातून विधी पदवी प्राप्त केलेले आणि अलिबाग नगरपरिषदेच्या २०२५ च्या झालेल्या निवडणुकीत नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या सहा यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये ॲड. मानसी म्हात्रे ( सदस्य), ॲड. श्वेता पालकर, ॲड. निवेदिता वाघमारे, ॲड. अश्विनी ठोसर, ॲड. अंकित बंगेरा, ॲड. ऋषिकेश माळी आणि ॲड. संदीप पालकर यांचा समावेश होता. मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले.

याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ॲड. मानसी म्हात्रे यांनी लोकनेते ॲड. दत्ता पाटील यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्या म्हणाल्या की, ''ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेज म्हणजे आदरणीय दादांचे चेंबर आहे, जिथे आम्हाला कायद्यासोबतच सामाजिक जाणीवेचे बाळकडू मिळाले.'' तर ॲड. अंकित बंगेरा यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करत महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात मा. ॲड. गौतम पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातही ठसा उमटवावा. आज लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेले हे माजी विद्यार्थी सध्याच्या विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने प्रेरणास्थान आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या डॉ. नीलम हजारे यांनी केले, तर सूत्रसंचालन आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. नीलम म्हात्रे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. संदीप घाडगे यांनी केले. या सोहळ्याला जे.एस.एम. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील, उपप्राचार्य डॉ. प्रविण गायकवाड, विधी महाविद्यालयातील प्रा. पियुषा पाटील, प्रा. चिन्मय राणे, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कारची पोलीस शिपायाला धडक

**नवीन पनवेल :** वाहन चालवण्याचा परवाना नसताना देखील कार भरधाव वेगाने चालवून पोलीस शिपायाला धडक दिली. या धडकेत खांदेश्वर पोलीस ठाण्याचे स्वप्निल अनंता कोळी हे जखमी झाले. या प्रकरणी प्रथम सचिन गायकवाड यांच्या विरोधात ८ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.स्वप्निल कोळी हे ७ जानेवारी रोजी एसपीरिया सोसायटी, सेक्टर ६, नवीन पनवेल येथे कोंबिंग ऑपरेशन दरम्यान कारवाई करत होते. यावेळी प्रथम गायकवाड (राहणार शिवाजीनगर झोपडपट्टी पनवेल) याने भरधाव वेगाने कार चालवली. पोलिसांनी त्याला कार थांबवण्याचा इशारा केला. मात्र त्याने कार न थांबवता जोरात धडक दिली.

# एलिमेंटरी, इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत यश

| पोलादपूर | प्रतिनिधी |

तालुक्यातील सहयोग प्रतिष्ठान संचालित साने गुरूजी माध्यमिक विद्यालय लोहारेच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य कला संचालनालय मुंबईतर्फे घेण्यात आलेल्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेमध्ये यश प्राप्त केले असून, एलिमेंटरी चित्रकला परीक्षेत २२ तर इंटरमिजिएट परिक्षेमध्ये १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

एलिमेंटरी चित्रकला परिक्षेत ए ग्रेडमध्ये पूर्वा देवे, विराज पवार, बी ग्रेडमध्ये ऋषभ सुतार यश केसरकर, रुद्र जाधव, समीक्षा चिकणे, सानवी चौधरी, श्रध्दा उतेकर, सिध्दी देवे, स्वयंम पारकर, तन्वी पार्ट, अदिती वाडकर, अमोघ खरे, आनंदी भंडळकर, आर्या सोनवणे, कस्तुरी इंगवले तर सी ग्रेडमध्ये धीरज तुढीलकर प्रज्ञा घावरे, दामिनी दराडे, अपेक्षा कदम, वैष्णवी पवार, अभय तुर्डे हे उत्तीर्ण झाले आहेत.

इंटरमिजिएट चित्रकला परिक्षेत ए ग्रेडमध्ये प्रांजल भोये, खुशी निकम, आर्या सलागरे ,शुभेच्छा मांढरे, सानवी पवार, बी ग्रेडमध्ये समर्थ मोरे, संचित उतेकर, श्रावणी इगवले ,आर्या म्हस्के, निधी चव्हाण, निखिल नरे, पल्लवी सुतार, वेदांत सकपाळ, रोहन चिंचघरकर तर सी ग्रेडमध्ये सुयश शिंदे, प्रेम घाडगे, आयान लोखंडे यांचा समावेश आहे. चित्रकला परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे चित्रकला शिक्षक देवघरकर यांचे तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था व पालकांतर्फे अभिनंदन करण्यात आले.

# स्थिर सर्वेक्षण पथकाला शिवीगाळ

**नवीन पनवेल :** स्थिर सर्वेक्षण पथक, खारघर हे गाडीची तपासणी करत असताना गाडीतील महिलेने पथकाला आणि पोलिसांना शिवीगाळ केली आणि व्हिडिओ कॅमेरा हिसकावून रस्त्यावर आपटले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात नऊ जानेवारी रोजी मनाली नामदेव ठाकूर (कोपरागाव) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. नऊ जानेवारी रोजी स्थिर सर्वेक्षण पथक दोन हे पोलिसांसह खारघर हिरानंदानी या ठिकाणी उभे होते. सायंकाळी पावणे सातच्या सुमारास हिरानंदानी सिग्नल कडून उत्सव चौकाकडे जाणारे रस्त्यावर पांढऱ्या रंगाची चार चाकी एर्टिगा गाडीला त्यांनी हात दाखवून थांबवले. यावेळी एमएच ४६ बी क्यू ७५७९ या गाडीची तपासणी केली.

# १४ लाखांची फसवणूक

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

ट्रेंडिंगच्या नावाने १४ लाख दहा हजार रुपये घेऊन रक्कम परत न करता ऑनलाइन फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात ८ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

६३ वर्षीय जेष्ठ नागरिक तेजेंद्रनाथ गर्ग हे कामोठे येथे राहत असून त्यांना फेसबुकवर एका महिलेची फ्रेंड रिक्वेस्ट आली. ती स्वीकारल्यानंतर शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक कशी करायची यासाठी तिने त्यांना व्हाट्सअप नंबर दिला. यावेळी त्या महिलेने मी जिथे गुंतवणूक करते त्या ॲपमध्ये गुंतवणूक करून बघा, रोज पाच टक्क्यांपर्यंत नफा होईल असा मेसेज केला. लिंक पाठवली असता त्यात अकाऊंट उघडले आणि पैसे गुंतवणूक केले. त्यानंतर त्यांनी आणखी पैसे जमा केले. विड्रॉल करण्यासाठी रिक्वेस्ट पाठवली असता ती स्वीकारली नाही. ॲपमधून रक्कम काढण्याचा प्रयत्न केला, मात्र ती काढण्यास परवानगी दिली नाही. त्यामुळे चौदा लाख फसवणूक केली.

# पेण तालुक्यात पहिल्या कृषी प्रदर्शनाचे आयोजन

## 'कृषी तरंग २०२६'चा उत्साहात शुभारंभ

| पेण | प्रतिनिधी |

पेण तालुक्यात वनराई व जेएसडब्ल्यू फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पहिल्या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. 'कृषी तरंग २०२६' या नावाने आयोजित करण्यात आलेल्या या कृषी प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा गुरुवारी, ८ जानेवारी रोजी पेण बायपास येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी वनराईचे विश्वस्त सागर धारिया, वनराईचे सचिव अमित वाडेकर, जेएसडब्ल्यू स्टील (डोलवी) चे उपाध्यक्ष आत्माराम बेटकेकर, जेएसडब्ल्यू फाऊंडेशनचे सामाजिक दायित्व प्रमुख सुधीर तैलोंग, जेएसडब्ल्यू फाऊंडेशनच्या रूपा दावणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

हे कृषी प्रदर्शन ८ व ९ जानेवारी २०२६ या दोन दिवसांच्या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, मत्स्यशेती, दुग्धव्यवसाय आदी विषयांवर विविध कार्यशाळांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शेतीसाठी आवश्यक असलेली अवजारे, खते व औषधे, महिला बचत गटांचे व्यवसाय, विविध शासकीय विभाग व त्यांच्या योजनांचे प्रदर्शनही या ठिकाणी मांडण्यात आले होते.

या कृषी प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळून शेतीपूरक व्यवसायांना चालना मिळाली, असा विश्वास आयोजकांच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

# कोकण ज्ञानपीठ विद्यालयात प्रबोधन कार्यक्रम

| उरण | प्रतिनिधी |

उरण येथील कोकण ज्ञानपीठ विद्यालययात कायदेविषयक शिबीर व रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या अनुषंगाने प्रबोधन कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कायदेविषयक माहिती आणि रस्ता वाहतूक नियमांबाबत जागरूकतेचे माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमात एम.एस. काझी, एस.पी. वानखेडे, जे.के. आर. टंडन दिवाणी न्यायाधीश, उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा मुख्य विषय कायदेविषयक शिबीर व रस्ता वाहतूक नियम हा होता. यावेळी विद्यार्थ्यांना रस्ता वाहतूक नियमांचे पालन कसे करावे, याबाबत समजावून सांगण्यात आले. यावेळी विद्यार्थी, शाळेचे शिक्षक व इतर कर्मचारी उपस्थित होते.

पान १ वरून

## आचारसंहितेचा भंग

यांनी बोलून दाखवला. महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीवरही भाष्य करत सांगितले की, शिवसेनेच्या पाठिंब्यामुळे भाजप मोठा झाला आहे. दरम्यान, या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी मेहनत घ्यावी, असे आवाहन करत पनवेलकरांनी मोठ्या संख्येने मतदान करण्यासाठी घराबाहेर पडावे, असे आवाहनही पाटील यांनी केले.

## भाजपकडून गुंडाला उमेदवारी

बोलले जात आहे.हॅपी सिंग याच्यावर विनयभंग (कलम ३५४-ब, ५०९), बेकायदेशीर जमाव, दंगल, घरात घुसून मारहाण, फौजदारी धमकी, मालमत्तेचे नुकसान यासह अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याचा आरोप आहे. तरीही त्याला केवळ निवडणुकीचे तिकीटच नव्हे, तर प्रशांत ठाकूर यांच्या शिफारसीवरून राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या सदस्यपदावरही स्थान मिळाल्याची चर्चा आहे. यामुळे 'गुन्हे दाखल असलेले लोक प्रशांत ठाकूर यांच्या जवळचे असतील, तर त्यांना कायदा लागू होत नाही का?' असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

एकीकडे बदलापूर प्रकरणात भाजपला अवघ्या २४ तासांत माघार घ्यावी लागलेली असताना, दुसरीकडे पनवेलमध्ये त्याच धर्तीचा निर्णय घेणे म्हणजे भाजप नेतृत्वाला जनतेच्या रोषाची भीती उरलेली नाही, की प्रशांत ठाकूर यांचे राजकीय वजन इतके वाढले आहे की पक्षही गप्प बसतो आहे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

'सुशासन' आणि 'शून्य सहनशीलता'च्या गप्पा मारणाऱ्या भाजपमध्ये प्रत्यक्षात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना संरक्षण देणारी यंत्रणा कार्यरत असल्याचे चित्र पनवेलमध्ये स्पष्टपणे दिसून येत असून, या सर्व प्रकाराची नैतिक आणि राजकीय जबाबदारी आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजप नेतृत्वावरच येऊन ठेपत असल्याची चर्चा तीव्र झाली आहे.

**चरणजित सिंग उर्फ हॅपीवर दाखल असलेले गुन्हे**

कलम ३५४(ब) महिलेवर हल्ला करून विनयभंग/ जबरदस्तीने कपडे काढण्याचा प्रयत्न, कलम ५०९ महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने अपमानास्पद शब्द, हावभाव, कलम १४३ बेकायदेशीर जमावाचा सदस्य, कलम १४७ दंगल, कलम १४९ बेकायदेशीर जमावातील प्रत्येक सदस्यावर सामूहिक गुन्ह्याची जबाबदारी, कलम ४५२ घरात घुसून मारहाणीची पूर्वतयारी, कलम ४२७ मालमत्तेचे नुकसान/तोडफोड, कलम ३२३ स्वेच्छेने दुखापत पोहोचवणे, कलम ५०४ शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान, कलम ५०६ फौजदारी धमकी (जीवे मारण्याची धमकी), वीजचोरीचा गुन्हा महावितरण अंतर्गत नोंद असल्याची चर्चा

## मालमत्ता करात ६५ टक्के दिलासा देणार

जाणीवपूर्वक राबवले नाही. त्यामुळे लाखो मालमत्ताधारकांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले. आमच्या पाठपुराव्यामुळे खारघरमध्ये अनेक मालमत्ताधारकांचा कर मोठ्या प्रमाणात कमी झाला असून, काही प्रकरणांमध्ये ८० ते ८५ हजार रुपयांपर्यंतचा दिलासा मिळाला आहे. आतापर्यंत सुमारे ३०० मालमत्ताधारकांना या कलमान्वये लाभ मिळवून दिला आहे. महापालिका निवडणुकीत जनतेने बहुमत दिल्यास ३१ जानेवारी २०२६ पूर्वी होणाऱ्या पहिल्या महासभेतच कलम १२९(अ)ची कडक अंमलबजावणी करून ६५ टक्के मालमत्ता कर सवलत देण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. या पत्रकार परिषदेला माजी सभापती काशिनाथ पाटील, उमेदवार सुदाम पाटील, सतीश पाटील, लीना गरड यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक नेते उपस्थित होते.

राज्याचे माजी महाअभियोगता आशुतोष कुंभकोणी यांच्या सल्ल्यानुसार सिडको वसाहतींतील सर्व मालमत्ताधारकांना कलम १२९(अ)नुसार सवलत देणे बंधनकारक असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. सध्याच्या प्रशासनाने शंभर टक्के कर आकारणी करून अन्याय केला असून, जर कलम १२९(अ)ची योग्य अंमलबजावणी झाली, तर अनेक नागरिकांना पुढील पाच ते सहा वर्षे मालमत्ता कर भरावा लागणार नाही, असा दावा बाळाराम पाटील यांनी केला. त्यामुळे मालमत्ता करातून दिलासा हवा असेल, तर महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहनही त्यांनी केले.

**पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र**

पनवेल महापालिकेच्या निवडणुकीस अवघे चार दिवस उरले असताना, मालमत्ता कराच्या मुद्द्यावर महाविकास आघाडीने अनोखे आणि थेट मतदारांपर्यंत पोहोचणारे आश्वासन दिले आहे. सिडको वसाहतींमधील मालमत्ताधारकांना दिलासा देण्यासाठी ५०० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर शपथपत्र देत मालमत्ता कर कमी करण्याची लेखी हमीपत्र (गॅरंटीकार्ड) देण्याची घोषणा करण्यात आली आहे. यावेळी महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र देत जनतेसमोर ते सादर केले. या घोषणेमुळे निवडणुकीच्या प्रचारात मालमत्ता कराचा मुद्दा केंद्रस्थानी आला आहे.

## रोहा शिंदे गटात राजकीय भूकंप

विश्वासात न घेता वरून निर्णय लादले जात असतील, तर अशा पदाला अर्थ उरत नाही, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. या राजीनाम्यानंतर रोहा तालुक्यातील शिवसैनिकांमध्ये तीव्र अस्वस्थता पसरली असून, अनेक कार्यकर्त्यांनी शिंदे यांच्या भूमिकेला जाहीर पाठिंबा दिला आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा राजीनामा शिवसेनेसाठी मोठा धक्का ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, या घडामोडींवर आमदार महेंद्र दळवी किंवा पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, या राजीनाम्यामुळे रोहा तालुक्यातील राजकारण चांगलेच तापले असून, पुढील काळात आणखी धक्कादायक घडामोडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## ..जिजामाता तलाव परिसरात अघोरी विद्येचा प्रकार

तलाव परिसरात चालण्यासाठी ट्रॅक, ओपन जिम आणि ज्येष्ठ नागरिक कट्टा असल्याने सकाळी व संध्याकाळी मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. पहाटे पाच वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यंत हा परिसर खुला असतो. परिसराला कुलूप, पथदिवे आणि प्रवेशद्वारावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. मात्र, ११ जानेवारी रोजी पहाटे मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांना ओपन जिमच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत लाल कापड, त्यावर ठेवलेले नारळ, लिंबू, सुपारी व नागवेलाची पाने आदी साहित्य आढळून आले. एकाच ठिकाणी अनेक नारळ आढळल्याने हा अघोरी विद्येचा प्रकार असावा, असा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

हा प्रकार पाहून नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, सार्वजनिक ठिकाणी अघोरी विद्येसाठी हेच ठिकाण का निवडले गेले, असा सवाल उपस्थित केला जात आहे. तसेच रात्रीच्या वेळी बंद असलेल्या तलाव परिसरात प्रवेश कसा झाला, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. कुंपणावरून प्रवेश केला असावा, अशी शक्यता व्यक्त केली जात असून, ग्रामपंचायतीने सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नेरळ पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. या प्रकारामुळे नेरळ परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड संतापाची भावना असून, अशा कृत्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी केली जात आहे.

## अलिबागच्या हवेवर प्रदूषणाचे सावट

उत्सर्जन यामुळे हवेचा दर्जा अधिकच खालावत असल्याचे दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून हवा गुणवत्ता निर्देशांक सातत्याने १०० च्या वर नोंदवला जात आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषांनुसार ० ते ५० 'चांगली', ५१ ते १०० 'समाधानकारक', १०१ ते २०० 'मध्यम', २०१ ते ३०० 'वाईट', ३०१ ते ४०० 'अत्यंत वाईट' आणि ४०० पेक्षा जास्त 'अतिधोकादायक' हवा गुणवत्ता मानली जाते.

भारतीय हवामान विभागाने अलिबाग शहरासाठी कोरड्या वातावरणाचा अंदाज वर्तवला आहे. येत्या दिवसांत कमाल तापमान ३० अंश सेल्सिअसच्या आसपास, तर किमान तापमान १६ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. पावसाळ्यानंतर कोकणातील वाऱ्यांचा वेग मंदावल्याने हवेत साचलेली धूळ व प्रदूषक घटक बाहेर फेकले जात नाहीत. त्यामुळे बाष्पामुळे धुलीकण हवेतच तरंगत राहतात.

यासोबतच पायाभूत सुविधा, रहिवासी व व्यावसायिक संकुलांची बांधकामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. या कामांमधून उडणारी धूळ हवेचा दर्जा ढासळण्यास कारणीभूत ठरत आहे. भात कापणीनंतर शेतात उरलेली भाताची मुळे जाळणे, डंपिंग ग्राउंडवर कचरा जाळण्याच्या घटना यामुळेही प्रदूषणात भर पडत आहे. शनिवार-रविवारी पर्यटकांची संख्या वाढल्याने वाहनांची वर्दळ वाढते. वाहनांमधून बाहेर पडणाऱ्या धुरातील अतिसूक्ष्म कण वातावरणातील प्रदूषण अधिक तीव्र करतात.

## राजिप शाळेच्या विद्यार्थ्यांना इस्रोभेटीची संधी

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील इयत्ता सहावी ते आठवीच्या विज्ञान विषयातील गुणवंत विद्यार्थ्यांना राज्यांतर्गत व राज्याबाहेरील अभ्यास भेटीकरीता जाण्याची संधी प्राप्त होणार आहे. राज्यांतर्गत भेटीसाठी पुणे येथील आयआयएसईआर, आयुका, एनआयव्ही, एनसीएल, आयआयटएम तर राज्याबाहेर बंगळुरुस्थित इस्रोला भेट देण्यात येणार आहे. या भेटींसाठी गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार असून याकरिता मंगळवारी (दि.१३) रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विज्ञान परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

## लाचखोर तलाठ्यावर गुन्हा

कार्यालयात रीतसर अर्ज करण्यात आला होता. मात्र, सदर काम करून देण्यासाठी तलाठी सचिन घुमाड यांनी तक्रारदाराकडे पाच हजार रुपयांची लाच मागितल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. शासकीय कर्तव्य बजावताना बेकायदेशीर आर्थिक मागणी केल्याचा आरोप झाल्याने तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. तक्रार प्राप्त झाल्यानंतर एससीबी पेण विभागाने कायद्यानुसार पडताळणी कारवाई हाती घेतली. या कारवाईदरम्यान संबंधित अधिकाऱ्याने लाच मागणी केल्याचे स्पष्टपणे निष्पन्न झाल्याने पेण कार्यालयात क्रमांक २/२०२५ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



# खोरा बंदरात पर्यटकांची तोबा गर्दी

**■ बोटींची संख्या कमी असल्याने पर्यटक त्रस्त**

**■ सावलीसाठी निवारा शेडची गरज**

**। मुरुड-जंजिरा । सुधीर नाझरे ।**

मुरुड-जंजिरा येथील खोरा बंदर परिसर कोकणातील सुंदर असे ठिकाण आहे. एकदरा डोंगरापलीकडे समुद्राच्या कुशीत वसलेला प्रसिद्ध जंजिरा किल्ला, उजव्याबाजूस शिवरायांनी बांधलेला पद्मदुर्ग किल्ला, अगदी समोर दिघी प्रकल्प व डोंगरी गावच्या काळ्या दगडाच्या डोंगराखाली सुंदर पांढऱ्या वाळूत वसलेले खोरा बंदर पर्यटकांना अनेकवर्षांपासून आकर्षित करत असतो. परंतु, या परिसरात खऱ्याअर्थाने विकास झालेलाच नाही. येथे येणाऱ्या पर्यटकांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागते. त्यातच किल्ल्यात जाण्यासाठी बोटी देखील कमी पडत असल्याने पर्यटकांना तासन्तास ताटकळत बसावे लागते. त्यामुळे पर्यटक त्रस्त झाले आहेत.

रायगड जिल्ह्यातील मुरूड तालुक्याला मोठ्या प्रमाणात पर्यटक भेटी देत असतात. येथे येणारा पर्यटक आवर्जून मुरूड-जंजिरा किल्ल्याला भेट देतोच. या किल्ल्यावर दरवर्षी राजपुरी व खोरा बंदरातील जेट्टीवरून सात लाखापेक्षा जास्त पर्यटक भेट देत असतात. पर्यटकांच्या माध्यमातून प्रत्येक प्रवासी वर्गामागे ठराविक लेवी कर आकारला जाऊन त्याचे उत्पन्न महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डास मिळत असते. जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी नवीन जेट्टी व खोरा बंदरातून पर्यटकांना किल्ल्यापर्यंत पोहचवले जाते. या दोन्ही बंदरात सुट्टीच्या हंगामात तुफान गर्दी होत असते. खोरा बंदरातील नवीन जेट्टी प्रवाश्यांच्या सेवेवसाठी हे पहिले पाऊल आहे. त्यामुळे खोरा बंदरातील नवीन जेट्टी हि वरदायी ठरणार आहे. लांबी व रुंदी जास्त असल्याने या जेट्टीवर शेकडो पर्यटक अगदी सहज चढू व उतरू शकणार आहेत. ओहटीच्या वेळी नवीन जेट्टी खूपच आवश्यक ठरणार असून पर्यटकांचा खोळंबा होणार नाही. सध्या खोरा बंदरातील नवीन जेट्टीचे काम युद्धपातळीवर सुरु असल्याने मे अखेरपर्यंत हे काम पूर्ण होणार असून असंख्य प्रवासी व पर्यटकांना याचा मोठा लाभ होणार आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या जुन्या जेट्टीवरून ओहटीच्या वेळी प्रवासी वाहतूक करणे अडचणीचे ठरते. त्यामुळे या कामाला तातडीने निधी मंजूर करण्यात आला होता. सध्या बांधण्यात येणारी नवीन जेट्टी हि नव्या स्वरूपात बांधण्यात येणार असून सुमारे १५० मीटर पाण्याच्या आत नवीन जेट्टीचे काम केले जाणार आहे. जुनी जेट्टीची लांबी कमी असल्याने ओहटीच्या वेळी प्रवासी होड्या अडकून पडत असत. हि अडचण लक्षात घेऊन नवीन जेट्टी बांधण्यासाठी तिची लांबी वाढवण्यात आली आहे. त्यामुळे ओहटीच्या वेळी प्रवास करताना कोणताही त्रास प्रवासी वर्गाला होणार नाही. खोरा बंदरातून जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांना सहज जाता यावे यासाठी हि जेट्टी खूपच उपयुक्त ठरणार आहे.

असे असलेतरी सध्यपरिस्थितीत या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शनिवार-रविवार व सार्वजनिक सुट्यांच्या दिवशी मुरूड तालुक्यात पर्यटकांची संख्या वाढत चालली आहे. तसेच, मोठ्या प्रमाणात राज्यभरातील शाळेच्या सहली देखील याठिकाणी येत आहेत. खोरा बंदर व राजपुरी जेट्टी या ठिकाणाहून जंजिरा किल्ल्यात बोटीद्वारे जाता येते. परंतु, पर्यटकांची संख्या वाढल्याने बोटींची संख्या कमी पडू लागली आहे. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना तासन्तास बोटीचा वाट पाहत ताटकळत उभे राहावे लागत आहे. त्यातच, या ठिकाणी पर्यटकांना बोटीची वाट पाहत उभं राहण्यासाठी कोणतीही निवारा शेड नाही. त्यामुळे पर्यटकांना उन्हातच उभे राहावे लागते. त्यामुळे पर्यटकांमधून नाराजीचे सुर उमटत आहेत. त्यांच्याकडून याठिकाणी असलेल्या पार्कींगमध्ये सावलीसाठी शेड उभारण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

### पर्यटन वाढीसाठी विकासकामांची गरज

मुरूड येथील कपारीत वसलेल्या काळकाई आईच्या मंदिराखाली किनारा पर्यटकांना बोटींसाठी अतिशय सुंदर आहे. तसेच, येथील समुद्राचे पाणी देखील निळेशार व नितळ आहे. त्यामुळे येथील समुद्र स्कुबा डायविंगसाठी योग्य आहे. खोरा बंदर ते राजपुरी समुद्रालगत दगडावरून रस्ता काढला तर जगातील सुंदर सनसेट पॉईंट होऊ शकतो. कारण मुरूड-जंजिरा व पद्मदुर्ग या दोन जलदुर्गामधून सूर्यास्त होत असताना त्याचे प्रतिबिंब समुद्राच्या पाण्यात दिसते. हे मनमोहक सुंदर रूप फक्त याच किनाऱ्यावर पाहायला मिळते. त्यामुळे पर्यटन वाढीसाठी प्रशासनाकडून अशा प्रकारे विकास कामे करण्याची गरज असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

## निवडक



### नगरपरिषदेच्या शौचालयाची दुरवस्था

**श्रीवर्धन** : प्रादेशिक पर्यटन योजनेअंतर्गत २०१५-१६ साली श्रीवर्धन नगरपरिषदेचे सार्वजनिक शौचालय आणि स्नानगृह बांधण्यात आले होते. परंतु, कंत्राटदार अभावी ते दोन वर्षे बंद अवस्थेत आहे. मठाचा गवंड व शासकीय विश्रामगृह नजीकच्या आवारात समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांसाठी सार्वजनिक शौचालय, स्नानगृह व कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र खोली अशी अल्प शुल्कात व्यवस्था करण्यात आली होती. हे शौचालय कंत्राटी पद्धतीने चालवण्यासाठी देण्यात आले आहे. त्यापैकी मठाचा गवंड येथील सार्वजनिक शौचालय आणि स्नानगृहाचे कंत्राट घेण्यास कोणीच उत्सुक नसल्याने हे सुलभ शौचालय व स्नानगृह बंद अवस्थेत आहे. समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटकांची संख्या बघता मठाचा गवंड येथील सुलभ शौचालय सुरू होणे गरजेचे होते. परंतु, दोन वर्षे ते बंद अवस्थेत असल्यामुळे पर्यटकांनी त्याची कचरा पेटी केली आहे. या ठिकाणी मद्याच्या रिकाम्या बाटल्या व अंतर्वस्त्रे आढळून येतात. तर, काही समाजकंटकांनी बेसीन, शौचालय व स्नानगृहाच्या दरवाजांची नासधूस केली आहे. त्यामुळे आलेल्या पर्यटकांनी या बाबतीत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

### अंमली पदार्थाची विक्री करणारे जेरबंद

**पनवेल** : कळंबोलीतील स्टील मार्केट परिसरामध्ये दोन व्यक्ती अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती कळंबोली पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी स्टील मार्केट परिसरात सापळा लावला होता. यावेळी राजेश शर्मा (२६) व योगेश पवार (२५) हे दोघे त्या भागात संशयास्पदरीत्या आले असता, दबा धरून बसलेल्या पोलिसांनी दोघांची धरपकड केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडे असलेल्या बॅगेची झडती घेतली असता, त्यात ५ किलो ८२ ग्रॅम वजनाचा गांजा आढळून आला. पोलिसांनी हा गांजा जप्त करून दोघांची चौकशी केली असता, कळंबोली गावात राहणाऱ्या एका वक्तीने खरेदीसाठी हा गांजा मागवल्याचे त्यांनी सांगितले. त्यानुसार कळंबोली पोलिसांनी या तिघांविरोधात गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे.

## कामोठ्यातील पाणीटंचाईचा तीव्र निषेध

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महापालिका निवडणूकीच्या रणधुमाळीत कामोठे उपनगरातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. एरवी दुर्लक्षित राहणारा पाणीपुरवठ्याचा प्रश्न ऐन निवडणुकीच्या काळात उफाळून आल्याने मतदारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने सिडको प्रशासनाचा निषेध केला आहे.



कामोठे उपनगरात सुमारे अडीच लाखांची लोकवस्ती आहे. या उपनगराची दररोजची पाण्याची मागणी सुमारे ४२ दशलक्ष लीटर असताना प्रत्यक्षात केवळ ३२ दशलक्ष लीटर पाणी मिळते.अशातच कळंबोली सर्कल येथील मुख्य जलवाहिनीवरील व्हॉल्व तुटल्याने पाणीपुरवठा विस्कळीत झाला. शनिवारी दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असले तरी प्रत्यक्ष पाणी नियमित होण्यासाठी किमान एक दिवस लागणार असल्याने रविवारीही पाणीटंचाईची शक्यता आहे. निवडणुकीच्या काळात नळाला पाणी नसणे ही उमेदवारांसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. या अनागोंदी कारभाराचा शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उपशहर प्रमुख सचिन त्रिमुखे व विभागप्रमुख बबन गोगावले यांनी तीव्र शब्दात सिडको प्रशासनाचा निषेध केला आहे.

## डंपरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**पनवेल** : शिरढोण येथे एका डंपरची दुचाकीला धडक बसल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. तर, त्याचा सहकारी जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिरढोण गाव साईकृपा हॉटेल समोर मुंबई -गोवा महामार्गावरील गोवा लेनवरून जाणाऱ्या डंपरची दुचाकीला धडक बसली. या धडकेत दुचाकीस्वार अतुलकुमार शिवकुमार (२६) हा गंभीररित्या जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला आहे. तर, त्याचा सहकारी शुभम सरफणे (२८) हा जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



● मकर संक्रांत जवळ आल्याने पूजनासाठी लागणारे छोटे मडके (सुगड) बनवण्याच्या कामात अलिबाग जवळील रामनाथ कुंभार आळीतील चिरनेरकर कुटुंबीय व्यस्त आहेत. तयार सुगड बाजारात आकाराप्रमाणे ५० ते ६० रुपयांना ५ असे विकले जाणार आहेत. (छायाचित्र : समीर मालोदे)

## अवलिया शिवप्रेमीची सायकलस्वारी

### २२६ गडकिल्ल्यांची भटकंती

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

अवलिया शिवप्रेमी कार्तिक सिंग यांनी महाराष्ट्रातील सुमारे २२६ शिवकालीन गडकिल्ल्यांवर चक्क सायकलवरून प्रवास करत भटकंती केली आहे. दरम्यान, कोलाड येथील आंबेवाडी नाक्यावर सकल हिंदू समाजातर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच, त्यांना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



कार्तिक सिंग हे हरियाणामध्ये नोकरी करत होते. परंतु, त्यांना छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या अस्मितेची आणि विचारांची प्रेरणा निर्माण झाली. ही प्रेरणा घेऊन त्यांनी २४ डिसेंबर २०२४ पासून उत्तराखंड येथून सायकल वारी करत महाराजांच्या गड किल्ल्यांची भटकंती सुरू केली. त्यांनी प्रथम छत्रपती शिवरायांच्या जन्म ठिकाण असलेल्या शिवनेरी किल्ल्यावर नतमस्तक होऊन गडकिल्ले मोहिमेला सुरूवात केली. आता जवळपास त्यांनी २२६ गडकिल्ल्यांवर सायकलवरून प्रवास करत भटकंती केली आहे. त्यामुळे हा त्यांच्या जीवनातील महत्वाचा क्षण आणि एक आगळा-वेगळा आदर्श आजच्या पिढीसाठी आदर्शच म्हणावा लागेल. या प्रावासदरम्यान, कार्तिक सिंग हे गुरुवारी (दि.८) सायंकाळी कोलाड-आंबेवाडी नाक्यावर पोहचले. त्यावेळी त्यांचे सकल हिंदू समाज कोलाड आंबेवाडी पंचक्रोशीतर्फे स्वागत करण्यात आले. यावेळी कोलाडचे सहाय्यक पोलीस नरेश पाटील, महेशस्वामी जंगम, स्वप्नील विचारे, कामेश देवकर, रोहित शिंदे, अजय लोटणकर, विजय शिंदे, सोहम चौधरी यांच्यासह सकल हिंदू समाजाचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

## घरफोडीत लाखोंचा ऐवज चोरीला

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील एका बंद घरात घरफोडीची गंभीर घटना घडली. या घरफोडीत चोरट्याने लाखो रुपये किमतीचा ऐवज लंपास केल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रमोद जोरी यांच्या सचिन प्लाझा बिल्डिंग मधील बंद घरात चोरट्याने घरफोडी केली. या घरफोडीत जवळपास ८ लाख १३ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत. या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



## वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

क्षात्रेक्य समाज अलिबागच्या रौप्य महोत्सवी वर्धापन दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी हळदी कुंकू आणि खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम कुरूळ येथील क्षात्रेक्य माळी समाज सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाला अलिबाग तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. पैठणी फेम प्रतिम सुतार यांनी घेतलेल्या 'खेळ पैठणी' या खेळात वेश्वी गावातील रीमा ठाकूर या अंतिम विजेत्या ठरल्या. तर, वढाव गावातील सुचिता राऊत उपविजेत्या ठरल्या. या पैठणी सरिता नाईक आणि दीप्ती वर्तक यांनी प्रयोजित केल्या होत्या. दरम्यान, या कार्यक्रमाचे उद्घाटन आवास सरपंच अभिलाषा राणे, गुंजीस सरपंच सदिच्छा पाटील, वेश्वी ग्रामपंचायत सदस्य रसिका मगर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष द्वारकानाथ नाईक, रौप्य महोत्सव समिती अध्यक्ष प्रदीप नाईक, उपाध्यक्ष रमेश पाटील, कार्याध्यक्ष रवींद्र वर्तक, अविनाश राऊळ, सचिव श्रीनाथ कवळे, खजिनदार मनोज राऊळ, जगदीश कवळे, सदस्या शालिनी नाईक, निशा नाईक, स्नेहल कवळे, अस्लेषा नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

**शैक्षणिक वाटचालीत आणखी एक सुवर्णपान** | **आता एलएमपर्यंत यशाची झेप**

## जिवीता पाटील यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

ऐन तारुण्यात पतीचे छत्र हरपल्यानंतर पदरात असलेल्या लेकासह जीवनाशी दोन हात करत शिक्षण, नोकरी आणि समाजकार्य या तिन्ही आघाड्यांवर यशस्वी वाटचाल करणाऱ्या अंगणवाडी सेविका जिवीता पाटील यांनी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. एलएलबी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर आता त्यांनी एलएलएम ही पदव्युत्तर कायद्याची परीक्षा देखील यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे.



गेल्या १२ वर्षांपासून अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत असलेल्या जिवीता पाटील यांच्या नावापुढे 'ॲडव्होकेट' ही ओळख लागल्यानंतर आता एलएलएम पदवीधारक म्हणून त्यांची ओळख अधिक भक्कम झाली आहे. त्यांच्या या यशामुळे रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व महिला वर्गामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

जिवीता पाटील यांचे वय २१ वर्षे असताना पतीचे निधन झाले. एक वर्षाच्या मुलाला सोबत घेऊन त्यांनी संघर्षमय जीवनाची सुरुवात केली. एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प अलिबाग अंतर्गत चिखली विभागातील नवीन वाघविरा गावात अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत असताना त्यांनी शिक्षणाची कास कधीही सोडली नाही. त्यांच्या सासू मनोरमा पाटील यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे हा प्रवास शक्य झाला. आर्थिक अडचणी असतानाही भाजी व्यवसाय करत त्यांनी पेझारी-पोयनाड येथील को.ए.सो. लक्ष्मी शालिनी महिला महाविद्यालयातून प्रथम श्रेणीत बी.ए. पदवी संपादन केली. त्यानंतर वाशी येथील एच.बी.बी. ॲड. कॉलेजमधून बी.एड, तर मुंबई विद्यापीठातून एम.ए., एम.ए. एज्युकेशन व एम.फिल या पदव्युत्तर पदव्या प्राप्त केल्या. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथून एमएसडब्ल्यू पदवी प्रथम श्रेणीत मिळवली. त्यानंतर अलिबाग येथील ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजमधून एलएलबी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत कायद्याच्या क्षेत्रात प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी एलएलएम परीक्षा देखील यशस्वीरित्या उत्तीर्ण करून आपल्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एक सुवर्णपान जोडले आहे.

तसेच, जिवीता पाटील यांनी तेजस्विनी फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. जिल्हा न्यायालय अलिबाग येथील विधी सेवा प्राधिकरणात न्यायाधीश जयदीप मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अनेक जाणीव जागृती कार्यक्रम राबवून शासनाच्या मोफत योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवला आहे.

अंगणवाडी सेविका म्हणून काम करत एलएलबी व आता एलएलएमपर्यंत मजल मारणाऱ्या जिवीता पाटील यांनी 'ध्येय ठरवल्यास कोणतीही परिस्थिती अडथळा ठरत नाही' हा आदर्श समाजापुढे ठेवला आहे. त्यांच्या या प्रेरणादायी यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# इडीशी कसे लढावे?

इडी म्हणजे एनफोर्समेंट डायरेक्टोरेट. हे एक प्रकारचे पोलिसच आहेत. पण सुटाबुटातले. पैशांच्या मोठ्या भानगडी, म्हणजे शंभर कोटींच्या वरच्या वगैरे, झाल्या तर ते मैदानात येतात. पूर्वी यांचे नाव फार ऐकू येत नसे. पूर्वी म्हणजे २०१४ पूर्वी. त्यालाही आता बारा वर्षे झाली. गेल्या बारा वर्षात इडी ही नरेंद्र मोदी सरकारची डार्लिंग आहे. ही डार्लिंग सरकारने आदेश दिला की कुठेही धावायला तयार असते. परवा ती कोलकात्याला गेली होती. तिथे यंदा निवडणुका होणार आहेत. कुठल्याही राज्यात निवडणुका असल्या की इडीने तिथे जायचे हे ठरून गेलेले आहे. किंबहुना, एखाद्या प्रदेशात इडीच्या घिरट्या सुरू झाल्या की तिथे लवकरच निवडणुका होणार आहेत असे समजायला हरकत नसते. बंगालात ममता बॅनर्जींचे सरकार भाजपला उलथून टाकायचे आहे. पण गेल्या दोन विधानसभा निवडणुकांमध्ये ते जमलेले नाही. गेल्या वेळी तर ममता विक्रमी मतांनी विजयी झाल्या. परवा इडीने आयपॅक नावाच्या कंपनीवर छापा टाकला. ही कंपनी ममता यांच्या तृणमूल काँग्रेसला निवडणुकीच्या रणनीतीसाठी सल्ला देते. ही कंपनी प्रशांत किशोर यांनी स्थापन केली होती. पण ते आता दैनंदिन कामात नाहीत. ते बिहारमधील राजकारणात आहेत. इतरांना सल्ले देणारे आणि त्यातून शेकडो कोटी रुपये मिळवणारे प्रशांत किशोर बिहारच्या निवडणुकीत पार बुडाले किंवा साफ झोपले. तरीही त्यांच्या कंपनीवर राजकारण्यांचा भरवसा आहे. तर आयपॅकचे प्रतीक जैन यांच्यावर धाड पडली. तृणमूल काँग्रेसने गोव्यात २०२१ मध्ये विधानसभेच्या निवडणुका लढवल्या होत्या. त्यात बेकायदा पैसा वापरला गेला असे भाजपचे म्हणणे आहे. गोव्याच्याच संदर्भात असाच आरोप इडीने आम आदमी पक्षावरही केला होता. त्याला जबाबदार धरून अरविंद केजरीवाल यांच्या जवळच्या सहकाऱ्याला अटक झाली होती. त्या प्रकरणाचे पुढे काय झाले याचा कोणाला पत्ता नाही. मधल्या काळात केजरीवाल यांना भ्रष्टाचारी ठरवून दिल्ली विधानसभा कबजात घेण्याचा भाजपचा उद्देश मात्र साध्य झाला. आता बंगाल आणि ममतांबाबत तोच डाव खेळला जात आहे.

## रस्त्यावरची लढाई

पण ममता या संकटांना थेट अंगावर घेणाऱ्या राजकारणी आहेत. जयप्रकाश नारायण यांनी जेव्हा इंदिरा गांधींविरुध्द आंदोलन उभे केले होते तेव्हा ममता युवा काँग्रेसच्या लढाऊ कार्यकर्त्या होत्या. जयप्रकाशांची सभा कोलकात्यात होऊ देणार नाही असा त्यांचा चंग होता. त्यासाठी त्या जयप्रकाशांच्या गाडीपुढे आडव्या झाल्या. नंतर ती गाडी फोडण्यात आली. सुदैवाने जयप्रकाशांना काही झाले नाही. पण ममता त्या आंदोलनामुळे देशभर गाजल्या. नंतरही कम्युनिस्ट सरकारविरुध्द अशीच आंदोलने त्यांनी केली होती. आता मुख्यमंत्री झाल्या असल्या तरी त्यांच्या राजकारणाची तीच शैली कायम आहे. त्यानुसार इडीची धाड पडली आहे असे कळताच त्या सकाळी साडेसहा वाजता तिथे गेल्या आणि तेथून त्यांनी तृणमूल काँग्रेससंदर्भातील फाईल्स, हिशेबाच्या वह्या वगैरे साहित्य स्वतः ताब्यात घेतले. पक्षाच्या निवडणूक रणनीतीसंदर्भातील एक महत्वाची हिरवी फाईल त्यांनी स्वतःकडे घेतली व ती त्यांनी खुलेआम पत्रकारांना दाखवली. इडीची कारवाई चालू असताना थेट तिथे घुसून अशा रीतीने कागदपत्रे ताब्यात घेतल्याने आता अर्थातच वाद सुरु झाले आहेत. सरकारी कामात अडथळा आणल्याबद्दल ममता यांच्याविरुध्द उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. अर्थात त्यालाही ममता यांनी प्रत्युत्तर दिले असून तृणमूलच्या वतीनेही प्रतियाचिका दाखल झाली आहे. शिवाय, अमित शाह यांना कोळसा घोटाळ्याच्या आरोपींकडून पैसे मिळाल्याचे पुरावे आपल्याकडे असल्याचा सनसनाटी आरोपही त्यांनी केला आहे. योग्य वेळ येताच ते पुरावे बाहेर काढू अशी धमकी त्यांनी दिली आहे. आता हा वाद बराच काळ चालत राहील. कदाचित ममता यांचे सरकार बडतर्फ करण्याची धमकी दिली जाईल किंवा भाजपवाले तसे आंदोलन सुरु करतील. राज्यपाल यांचेच आहेत. त्यामुळे तेही आगलावी वक्तव्ये सुरू करतील. त्यांना धमकी आल्याचा कांगावा सुरू झाला आहे. पण ममता याला भीक घालणार नाहीत. उलट कोलकात्यात तृणमूलच्या आमदार-खासदारांनी एक जंगी मोर्चा शुक्रवारी आयोजित केला व त्यात ममता जातीने सहभागी झाल्या. रस्त्यावरची लढाई करायचा असेल तर आपण तयार आहोत असा स्पष्ट संदेशच त्यांनी यातून दिला आहे.

## महाराष्ट्राने धडा घ्यावा

नरेंद्र मोदींचे खुनशी सरकार, विद्वेषी भाजप आणि सैतानी प्रवृत्तीच्या इडी व सीबीआयसारख्या यंत्रणा यांच्याशी कसे लढावे याचा धडाच जणू ममता यांनी या प्रकरणात घालून दिला आहे. इडीच्या कारवाया सुरू झाल्या की, विरोधक एकदम गोगलगायीसारखे मऊ होतात हा आजवरचा अनुभव आहे. अनेक जण तर थेट भाजपचा रस्ता धरतात. महाराष्ट्रात अजित पवारांपासून अशोक चव्हाणांपर्यंत आणि एकनाथ शिंदे गटापासून ते रवींद्र वायकरांसारख्या शिवसैनिकांपर्यंत असंख्यांची उदाहरणे आपल्या डोळ्यापुढे आहेत. यापूर्वी इडीची नोटिस आल्यानंतर तिचा राजकीय फायदा करून घेणारा एकच नेता झाला. तो म्हणजे शरद पवार. त्यांनी अशी नोटीस आल्यावर वाजतगाजत थेट इडीचे कार्यालय गाठले व बोला काय ती चौकशी करा असा आवाज दिला. त्यावर ते अधिकारी काही बोलू शकले नाहीत व ती चौकशीही गुंडाळण्यात आली. इडीसारख्या सरकारी यंत्रणेचा घरच्या कुत्र्यासारखा असा वापर करणे हे मोदींच्या राजकारणाला साजेसे असले तरी या देशातील लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. पण सध्याच्या काळात विरोधी पक्ष हतबल आहेत. हा दुरुपयोग दिसत असूनही जनता भाजपला मतदान करणे सोडत नाही. न्यायालये त्यावर कडक भूमिका घ्यायला तयार नाहीत. निवडणूक आयोग डोळ्यावर कातडे ओढून बसलेला आहे. अशा स्थितीत ममता यांच्याप्रमाणे धटिंगणबाजी करूनच इडी व केंद्र सरकारचे दात त्यांच्या घशात घातले पाहिजेत. अर्थात, यासाठी भाजपविरुध्द लढण्याची जिगर लागेल. रस्त्यावर उतरण्याची व दीर्घ काळ संघर्ष करण्याची तयारी लागेल. सर्वात महत्वाचे म्हणजे वैयक्तिक रीत्या इडी किंवा सीबीआयला कोठेही भ्रष्टाचाराचा आरोप करता येणार नाही असे चारित्र्य लागेल. अशा संघर्षात प्रसंगी तुरुंगातही जावे लागू शकते. पण ममता किंवा त्यांच्यासारखे नेते याची पर्वा करीत नाहीत. आज असा ठाम निर्धार दाखवला तर आणि तरच जनता अशा नेत्यांच्या मागे उभी राहण्याची शक्यता आहे. एखाद्या पक्षाचा किंवा त्यातल्या बहुसंख्य नेत्यांचा एक पाय भाजपमध्ये आहे अशी शंका आली तर जनता अशा नेत्यांच्या तात्पुरत्या आरडाओरडीला किंमत देणार नाही. महाराष्ट्रात व देशात हेच घडते आहे व त्याचमुळे राज्याच्या राजकारणाचा बट्ट्याबोळ झाला आहे. ब्रिटिशांविरुध्द स्वातंत्र्याच्या लढ्यात महाराष्ट्र व बंगाल खांद्याला खांदा लावून लढले. त्यानंतर बंगालमध्ये प्रदीर्घ काळ कम्युनिस्टांची सत्ता राहिली. महाराष्ट्रात काँग्रेसची सत्ता असली तरी तिला डावे पक्ष, शेकाप इत्यादींनी कायम वेसण घातली. आज मात्र दुर्दैवाने महाराष्ट्र बंगालच्या मागे पडला आहे. ममतांकडून महाराष्ट्राने काही तरी शिकायला हवे.

---

विचार

# देशातील पहिला वन्यजीव सुरक्षित महामार्ग

***मध्य प्रदेशमधील घनदाट नौरादेही येथील वीरांगना राणी दुर्गावती व्याघ्र प्रकल्पातून जाणारा भोपाळ-जबलपूर हा राष्ट्रीय महामार्ग ४५ देशातील पहिला वन्यजीव-सुरक्षित महामार्ग ठरला आहे. या महामार्गाच्या बांधकामात रस्त्यावर पाच मिलीमीटर जाडीचे 'रेड टेबल-टॉप ब्लॉक मार्किंग' लावण्यात आले आहेत. केवळ चालकांचा वेग कमी करणे हा यामागील उद्देश नसून वन क्षेत्रात राहणाऱ्या वन्यजीवांची सुरक्षितता सुनिश्चित केली जात आहे.***



प्रा. सुखदेव बखळे

मध्य प्रदेशमधील नौरादेही व्याघ्र प्रकल्पातून जाणाऱ्या महामार्गाचा सुमारे ११.९६ किलोमीटरचा भाग दोन आणि चार लेनमध्ये विकसित करण्यात आला आहे. सुमारे दोन किलोमीटर लांबीच्या संवेदनशील वन्यजीव क्षेत्रात हे 'रेड टेबल-टॉप मार्किंग' बसवण्यात आले आहेत. एखादे वाहन या लाल ब्लॉकवरून जाते, तेव्हा चालकाला थोडासा धक्का बसतो. त्यामुळे तो त्याचा वेग कमी करतो. लाल रंग आधीच धोक्याचा सिग्नल मानला जातो, म्हणून हे तंत्रज्ञान चालकांच्या मानसशास्त्रावरदेखील परिणाम करते. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय)च्या अधिकाऱ्यांच्या मते, वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे या भागात हरीण, नीलगाय आणि इतर वन्यजीवांचे रस्ते अपघात पूर्वी सामान्य झाले होते. हा भाग धोकादायक क्षेत्र मानला जात होता. त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानके लक्षात घेऊन हे नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यात आले. रस्त्याच्या दोन्ही बाजूला फक्त 'रेड टेबल-टॉप मार्किंग'च नाही तर पाच मिलीमीटर जाडीच्या पांढऱ्या पेव्हर शोल्डर लाईन्सदेखील तयार करण्यात आल्या आहेत. एखादे वाहन रस्त्यावरून घसरले किंवा चालक झोपला तर त्यांना सतर्क करण्यासाठी त्वरित कंपनांचा वापर केला जातो. शिवाय प्राणी सुरक्षितपणे रस्ता ओलांडू शकतील, यासाठी २५ वन्यजीव अंडरपास बांधण्यात आले आहेत. या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीपासून येथे एकही अपघात किंवा वन्यजीवांना दुखापत झाल्याचे वृत्त नाही. वीरांगना राणी दुर्गावती व्याघ्र प्रकल्प हा मध्य प्रदेशमधील सर्वात मोठा व्याघ्र प्रकल्प आहे. त्याचे एकूण क्षेत्रफळ २,३३९ चौरस किलोमीटर आहे. त्यात १,४१४ चौरस किलोमीटरचे कोअर आणि ९२२ चौरस किलोमीटरचे बफर क्षेत्र समाविष्ट आहे.

हा परिसर भारतीय लांडगा, पँथर, जंगली कुत्रा, कोल्हा, राखाडी कोल्हा आणि ओटर यासारख्या अनेक दुर्मिळ वन्यजीव प्रजातींसाठी एक प्रमुख अधिवास आहे. २०१८ मध्ये राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रकल्पात त्याचा समावेश करण्यात आला होता आणि वाघांची संख्या आता २६ वर पोहोचली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी एक्सवर पोस्ट केले, की विकास आणि पर्यावरण यांच्यातील संतुलन आणि वन्यजीवांचे संरक्षण लक्षात घेऊन भारतात प्रथमच महामार्गांवर पाच मिलीमीटर लाल 'रेड टेबल-टॉप ब्लॉक मार्किंग'चा वापर करण्यात आला आहे. २०१८ मध्ये या जिल्ह्याचा राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रकल्पात समावेश करण्यात आला. येथे चितळ, चिंकारा आणि नीलगाय यांचीही संख्या वाढत आहे. काळवीटांनादेखील संरक्षित क्षेत्रात सोडण्यात आले आहे. त्यामुळे मांसाहारी प्राण्यांना नैसर्गिक अन्न चक्र मिळते. नौरादेही व्याघ्र प्रकल्प सागर, दमोह आणि नरसिंहपूर या तीन जिल्ह्यांमध्ये पसरला आहे. हा प्रकल्प मध्य प्रदेशमधील सर्वात मोठा व्याघ्र प्रकल्प आहे. पेंच आणि कान्हा येथून चितळ आल्याने गेल्या तीन ते चार वर्षांमध्ये त्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली आहे. संरक्षणामुळे चिंकारा आणि नीलगायीची लोकसंख्यादेखील सातत्याने वाढत आहे. काळवीटांची वाढती संख्या येथील मांसाहारी प्राण्यांसाठी चांगला अन्नपुरवठा करते. दोन वेगवेगळ्या प्रसंगी १५३ आणि ३५ काळवीटांना पकडून संरक्षित क्षेत्रात सोडण्यात आले.

मध्य प्रदेशची राजधानी भोपाळला सांस्कृतिक राजधानी जबलपूरशी जोडणारा राष्ट्रीय महामार्ग ४५ चा एक महत्त्वाचा भाग आता देशभरात महामार्ग अभियांत्रिकी आणि वन्यजीव संवर्धनाचे एक मॉडेल बनला आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रकल्प अंमलबजावणी युनिटने नरसिंहपूर आणि जबलपूरमधील सुमारे बारा किलोमीटरच्या अत्यंत संवेदनशील भागाचे संरक्षण करण्यासाठी अभूतपूर्व आणि नावीन्यपूर्ण तंत्रांचा वापर केला आहे. हा भाग वीरांगना दुर्गावती व्याघ्र प्रकल्पाच्या (पूर्वी नौरादेही वन्यजीव अभयारण्य) सीमेवरून जातो. वन्यजीवांच्या वावरामुळे आणि डोंगराळ प्रदेशामुळे हा भाग पूर्वी एक प्रमुख ब्लॅक स्पॉट (अपघात-प्रवण क्षेत्र) मानला जात होता. महामार्ग चौकापासून बेलखेडापर्यंत असंख्य अपघात होत असत. त्यामुळे प्रवासी आणि वन्यजीव दोघांसाठीही सुरक्षित कॉरिडॉर सुनिश्चित करण्यासाठी १२२.२५ कोटी खर्चाच्या ११.९६ किलोमीटर (२-लेन ते ४-लेन रुंदीकरण) प्रकल्पात विशेष उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. सुमारे १२ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर पाच मिलीमीटर जाडीचे उंच लाल मार्किंग लावण्यात आले आहे. एखादे वाहन त्यातून जाते, तेव्हा हलकासा धक्का निर्माण करते. त्यामुळे चालक आपोआप वेग कमी करतो. रस्त्यावरून जाणाऱ्या स्थानिक रहिवाशांनी सौंदर्य आणि सुरक्षिततेमुळे त्याला 'रेड कार्पेट' असे टोपणनाव दिले आहे. येथे वन्य प्राण्यांची सुरक्षित हालचाल सुनिश्चित करण्यासाठी २५ अंडरपास बांधण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांना महामार्गाच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूला धोका न घेता जाता येते.

येथे वन्यजीवांना रस्ता ओलांडण्यापासून रोखण्यासाठी संपूर्ण संवेदनशील भागात 'चेन-लिंक' कुंपण बसवण्यात आले आहे. रात्रीच्या अपघातांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुंना पाच मिलीमीटर जाडीची पांढरी खांद्याची रेषा तयार करण्यात आली आहे. चालक झोपेमुळे किंवा दुर्लक्षामुळे मार्गावरून दूर जायला लागला, तर ही रेषा लगेचच तीव्र धक्का देऊन त्याला सावध करते. या प्रकल्पाचे उद्दिष्ट प्रवासी आणि वन्यजीवांसाठी सुरक्षित प्रवास सुनिश्चित करणे हे आहे. भविष्यात हा महत्त्वाचा मार्ग पुन्हा कधीही 'ब्लॅक स्पॉट' बनू नये, याची दखल घेण्यात आली आहे. देशासाठी हा महामार्ग सुरक्षेचे एक अनुकरणीय मॉडेल आहे. जंगली क्षेत्रातून जाणारा आणि डोंगर कापून बांधलेला हा रस्ता तीव्र वळणांचा आहे. यावर उपाय म्हणून 'स्पीड डिटेक्टर' बसवण्यात आले आहेत आणि रस्त्याला लाल रंग देण्यात आला आहे. त्याला 'टेबलटॉप रेड मार्किंग' म्हणतात. ते दुरून सुंदर दिसते पण लाल रंग पाहून चालक वेग कमी करतात. त्यामुळे या भागात अपघातांचा धोका कमी होतो. सध्या हा रस्ता त्याच्या सौंदर्यामुळे आणि चालकांसाठी सुरक्षिततेमुळे चर्चेत आहे. अलिकडेच झालेल्या एका अपघातात चित्त्याच्या पिल्लाचा मृत्यू झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. रस्त्याच्या कडेला कुंपण घालण्यात आले आहे. वेग मोजणारी उपकरणे बसवण्यात आली आहेत. हे सर्व मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याच्या उद्देशाने आहे.

या उपक्रमामुळे विकास आणि पर्यावरण संरक्षण हातात हात घालून जाऊ शकतात, हे दिसते. रस्ते बांधणीसोबतच प्राण्यांच्या सुरक्षिततेचा विचार करणे महत्त्वाचे आहे. भोपाळ-जबलपूर महामार्गावर सुरू करण्यात आलेले हे 'रेड टेबलटॉप मार्किंग' भारतातील रस्ते सुरक्षा आणि वन्यजीव संवर्धनासाठी एक नवीन उदाहरण ठरु शकते. ते यशस्वी झाल्यास देशभरातील इतर संवेदनशील महामार्गांवरही लागू केले जाऊ शकते. हा लाल रस्ता 'स्पीड ब्रेकर'पेक्षा वेगळा आहे. तो सामान्य स्पीड ब्रेकर किंवा रंबल स्ट्रिपसारखा नाही. तो थोडा उंचावलेला आहे आणि दुरून स्पष्टपणे दिसतो. असे असले, तरी अनेक लोकांना भीती वाटते, की वेगळ्या रंगाचा रस्ता 'एडीएएस' प्रणालीला गोंधळात टाकू शकतो; परंतु तज्ज्ञ म्हणतात, की आधुनिक 'एडीएएस' केवळ रंगावर अवलंबून नाही. ते रस्त्याच्या कडा, कॉन्ट्रास्ट, रिफ्लेक्टिव्हिटी आणि कॅमेरे, रडार आणि लिडार सारख्या सेन्सरमधून माहिती घेते. हा लाल रस्ता दुबईच्या शेख झायेद रस्त्याचे अनुकरण आहे. शेख झायेद रस्त्यावर विशिष्ट भागात स्पष्ट रंगीत खुणा आहेत. त्यामुळे अपघात कमी झाले आहेत. भारतातील या प्रयोगातून रस्ते आता केवळ वाहनांसाठीच नव्हे तर मानव, प्राणी आणि पर्यावरण लक्षात घेऊन बांधले जात आहेत, असे दिसून येते. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या मते, हा प्रकल्प पर्यावरण मित्रत्व, सार्वजनिक सुरक्षा आणि वन्यजीव संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे लाल रस्ता धोक्याचे नव्हे, तर बुद्धिमान डिझाइनचे प्रतीक ठरत आहे.

**(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

---

# शिक्षण असूनही तरूण बेरोजगार

वैष्णवी वाडकर

राज्यातील लाखो तरुण-तरुणी आज नोकरीच्या शोधात आहेत. उच्च शिक्षण, पदव्या आणि विविध कौशल्ये असूनही अनेक तरुणांना रोजगार मिळत नाही, हे आजचे कटू वास्तव्य आहे. आजच्या काळात कॉर्पोरेट क्षेत्रातील स्पर्धा प्रचंड वाढली आहे. त्याचबरोबर कंपन्यांच्या अपेक्षाही अधिक वाढल्या आहेत. 'अनुभव हवा, पण संधी नाही' अशा चक्रात तरुण वर्ग अडकला असून तो दिशाहीन झाला आहे. तर दुसरीकडे, सरकारी नोकऱ्या व स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत सतत समोर येणारे घोटाळे तरुणांचा व्यवस्थेवरील विश्वासला तडा पोचवत आहे. दरम्यान, ऑनलाईन जॉब पोर्टल्स, मोबाईल ॲप्स आणि ओळखींच्या माध्यमातून दररोज हजारो अर्ज भरले जात आहेत. मात्र, त्याला मिळणारा अल्प प्रतिसाद तरुणांना मानसिकदृष्ट्या खचवणारा ठरत आहे. त्यामुळे शिक्षण असूनही नोकरी मिळत नसल्याने आजचा तरूण बेरोजगार बनत चालल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

राज्यातील वाढत्या बेरोजगारीवर उपाय म्हणून सरकारने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवली होती. या योजनेमुळे अनेक तरुणांना रोजगाराची आशा निर्माण झाली होती. मात्र, निधीअभावी अनेक तरुणांना प्रत्यक्ष काम मिळाले नाही. तर, काही ठिकाणी काम करूनही महिनोनमहिने वेतन थकीत राहिले. या योजनेबाबत निर्माण झालेली आशा आता निराशेत बदलताना दिसत आहे. त्यामुळे या वाढत्या बेरोजगारीला सरकार जबाबदार आहे, असा आरोप तरुणांकडून केला जात आहे. त्यामुळे राज्यात १ लाख ३४ हजार तरुण बेरोजगार आहेत.

तत्पुर्वी, कोरोना काळात संपूर्ण देशात लॉकडाउन जाहीर करण्यात आले होते. या लॉकडाउनचा सर्वात जास्ती परिणाम नोकरी व्यवसायांवर झाला होता. मागच्या दोन वर्षांत अनेकांना नोकरी गमावणं, पगार कपात किंवा असलेल्या नोकरीत अनिश्चितता यांचा सामना करावा लागला आहे. याचा परिणाम म्हणून २०२० मध्ये तब्बल ३,५४८ तरुण-तरुणींनी हतबलतेतून आत्महत्याही केल्या आणि हा आकडा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. बेरोजगारमुळे २० ते २८ वयोगटातील तरुण-तरुणींमध्ये मानसिक तणाव, नैराश्य आणि असुरक्षिततेची भावना झपाट्याने वाढत आहे. एकीकडे बेरोजगारांची संख्या वाढत असताना दुसरीकडे उपलब्ध नोकऱ्या अपुऱ्या पडत आहेत आणि ही स्थिती अधिकच गंभीर होत चालली आहे. राज्यात आज नोकऱ्या असल्या तरी त्या स्थानिक नागरिकांना मिळत नसून परप्रातीयांच्या हाथी जात आहेत. त्यातच कॉर्पोरेट क्षेत्रातील वाढत्या अपेक्षांच्या ओझ्याखाली तरुणांचा आत्मविश्वास कमी होत चालला आहे. हल्ली कोणत्याही क्षेत्रातील कंपनीमध्ये नोकरी मिळवण्यासाठी गेल्यास १ ते २ वर्षांच्या अनुभवाची मागणी केली जाते. अर्थातच नुकतेच पदवीचे किंवा पदव्युत्तर पदवीचे शिक्षण झालेल्या तरुणांकडे १ ते २ वर्षांचा अनुभव असणे शक्य नाही. अशा वेळी तरुणांनी नोकरी कशी मिळावावी? असा संतप्त प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे मेहनत करूनही अपेक्षित संधी न मिळाल्याने अनेक तरुण हतबल होत आहेत.

नोकरी मिळवण्यासाठी अनुभव हवा म्हणून ३ महिने, ६ महिने किंवा वर्षभराची इंटर्नशिप केली जाते. अनेकदा या इंटर्नशिप्समधूनच पुढे नोकरी दिली जाते. मात्र, अनेकदा फक्त अनुभव मिळवण्यासाठी वेतनाविना इंटर्नशिप केली जाते. पुढे जाऊन या इंटर्नशिपचा अनुभव कामाला येतोच असे नाही. त्यामुळे मेहनत करून देखील नोकरी मिळवण्याची संधी मिळत नसल्याचे तरुणवर्गाकडून बोलले जाते. राज्यात नोकऱ्यांच्या संधी कमी असल्यामुळे अनेक तरुणांनी व्यवसायाचा मार्ग निवडला आहे. व्यवसायाचा मार्ग निवडला तरी सुरुवातीच्या टप्प्यात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. भांडवलाचा अभाव, अनुभवाची कमतरता आणि योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे अनेक तरुणांचे व्यवसाय सुरुवातीलाच अडचणीत येत आहेत. नोकरी नाही आणि व्यवसाय स्थिर नाही, अशा दुहेरी संकटात तरुण सापडले आहेत. मात्र, या सर्व संकटांवर मात करत आज अनेक तरुण ठामपाने आपला व्यवसाय चालवत आहेत. त्यामुळे नोकरी नाही तर व्यवसाय सही हे धोरण हाती घेऊन तरुण आपल्या रोजगाराचा मार्ग स्वतः तयार करत आहेत.

आजचा तरुण शिक्षण, कौशल्य आणि मेहनती असूनही नोकरी मिळवण्यासाठी संघर्ष करत आहे. अनुभवाची अट, कमी संधी आणि वाढती स्पर्धा यामुळे अनेक तरुणांना नोकरी मिळत नाही. ऑनलाईन अर्ज व प्रत्यक्षात इंटरव्हिव्ह देऊनही प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांचा आत्मविश्वास कमी होत चालला आहे. नोकरी मिळणे ही केवळ उत्पन्नाची गरज नसून तरुणांचे पुढील भविष्य आहे. योग्य वेळी योग्य नोकरी न मिळाल्यास तरुण मानसिक तणावात सापडत आहेत. त्यामुळे तरुणांना संधी देणे महत्वाचे ठरत असून स्थानिक तरुणांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. तरच, शिक्षण घेतलेल्या व कौशल्यधारक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

---

लोकसंसद

## श्रीराममंदिरात नमाज पढू इच्छिणाऱ्यांची पाळेमुळे खणून काढा !

अयोध्येतील श्रीराम मंदिरात घुसून नमाज पठण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तिघा जिहाद्यांना सुरक्षा रक्षकांनी अटक केल्याचे वृत्त वाचनात आले. या तिघांमध्ये एका तरुणीचाही समावेश आहे. त्यांना पकडताच त्यांनी 'अल्लाहू अकबर'च्या घोषणा दिल्या. या तिघांची चौकशी सुरु असून ते जिहादी घातपात करण्याच्या उद्देशाने आले होते का याविषयीही अधिक शोध घेण्यात येत आहे. पाचशेहून अधिक वर्षाच्या संघर्षानंतर अयोध्येत श्रीराम जन्मभूमीत प्रभू श्रीरामचंद्रांचे भव्य मंदिर उभे राहिले आहे. या संघर्षामध्ये अनेक तरुणांनी आपल्या घरादाराचा त्याग केला, कित्येक कारसेवकांचा बळी गेला आहे, कितीतरी जण आयुष्यभरासाठी जायबंदी झाले आहेत, कित्येकांनी आपल्या जीवनभराच्या संपत्तीचा राममंदिराच्या उभारणीसाठी त्याग केला आहे. हजारो रामभक्तांच्या त्यागातून, प्रदीर्घ न्यायालयीन लढ्यातून हे मंदिर उभे राहिले आहे. प्रभू श्रीरामचंद्राचे पुरातन मंदिर पाडून याठिकाणी बाबरी मशीद बांधण्यात आली होती हे न्यायालयात सिद्ध करण्यासाठी संशोधन करून न्यायालयात पुरावे सादर करावे लागले. न्यायालयाने ते मान्य केल्यानंतरच श्रीरामललांच्या बाजूने निकाल देण्यात आला. हे मंदिर म्हणजे केवळ मंदिर नसून प्रभू श्रीरामाच्या अस्तित्वाचा पुरावा आहे, जगभरातील कोट्यवधी रामभक्तांचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे हे मंदिर उभे राहिल्यापासून याठिकाणी सतत भक्तांची रीघ लागलेली असते. लुटीच्या उद्देशाने भारतात आलेल्या बाबराने भारतात मोघल साम्राज्याची स्थापना केली. अनेक मंदिरांची लूट आणि तोडफोड करून मशिदी उभारल्या, तलवारीच्या जोरावर धर्मांतरे केली अशा बाबराचे वंशज भारतात आजही जिवंत आहेत याची साक्ष या घटनेनेमुळे आली आहे. हजारो भक्तांच्या उपस्थितीत आणि कडेकोट पोलीस बंदोबस्तात जिहादी मंदिरात प्रवेश करतात ही मंदिराच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही गंभीर बाब आहे. धर्माच्या आधारावर देशाची फाळणी होऊन पाकिस्तान हा स्वतंत्र देश मिळूनही जिहाद्यांचे समाधान झालेले नाही. भारतात आतंकवादी हल्ले करून आजतागायत जिहाद्यांनी देशाचे अतोनात नुकसान केले आहे. भारतात साजरे होणारे हिंदू धर्मियांचे सण उत्सव आजही आतंकवाद्याच्या छायेखाली साजरे होतात. भारतातील सुप्रसिद्ध मंदिरे नेहमीच आतंकवाद्यांच्या रडारवर राहिली आहेत त्यामुळे राममंदिरात घुसलेले जिहादी कोणत्या उद्देशाने मंदिरात आले होते याची कसून चौकशी करून त्यांना बळ पुरवणाऱ्यांना शोधून त्यांची पाळेमुळे नष्ट केली जावीत जेणेकरून भविष्यात कोणताही जिहादी अशा प्रकारचे धाडस करणार नाही.

**– जगन घाणेकर, घाटकोपर**

---

विशेष

# हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणास्थान : राजमाता जिजाऊ

ज्या मुलुखात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज जन्मले त्या महाराष्ट्राची आजच्या राज्यकर्त्यांनी केलेली दुर्दशा पाहिल्यावर छत्रपती शिवरायांनी पुन्हा एकदा जन्म घ्यावा असे आज प्रत्येकाला वाटत आहे. पाच पातशाह्यांना नेस्तनाबूत करून हिंदवी स्वराज्याची गुढी उभारण्याचा भीमपराक्रम करणारे विश्वातील एकमेव उदाहरण म्हणजे छत्रपती शिवराय आणि त्यांना त्यासाठी प्रेरणा देणाऱ्या, प्रोत्साहित करणाऱ्या, घडवणाऱ्या विभूती म्हणजे साक्षात देवीस्वरूप राजमाता जिजाऊ. आज छत्रपती शिवराय या धर्तीवर अवतरावे असे वाटत असेल, तर आधी राजमाता जिजाऊंचा जन्म व्हायला हवा कारण हे असामान्य आव्हान पेलण्याची शक्ती केवळ माँ जिजाऊंमध्येच होती. पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी गेलेली आणि मोबाईल-टीव्ही मालिकांमध्ये रमणारी आजची स्त्री हे आव्हान पेलू शकेल का? तर याचे उत्तर मुळीच नाही. इतिहासात जसे छत्रपती शिवाजी महाराज एकमेव झाले, तशा राजमाता जिजाऊसुद्धा एकमेवाद्वितीय होत्या. राष्ट्ररक्षणासाठी सुपुत्र दे, अशी प्रार्थना जिजाऊंनी भवानीदेवीला केली. बाल शिवाजीच्या जन्मानंतर त्यांच्यावर लहानपणापासूनच राष्ट्र आणि धर्म यांविषयीचे संस्कार होण्यासाठी जिजाऊंनी त्यांना प्रभु श्रीराम, मारुती, श्रीकृष्ण इत्यादी देवतांच्या, तसेच महाभारत आणि रामायण यांतील कथा सांगून राष्ट्र अन् धर्म भक्तीचे बाळकडूच पाजले. पुण्यात रहाण्यासाठी आल्यानंतर त्यांनी कसब्यात गणपतीची स्थापना केली आणि जोगेश्वरी अन् केदारेश्वर यांचा जीर्णोद्धार केला. तत्कालीन राजकारणात आणि समाजकारणात जिजाबाई सतत लक्ष घालत होत्या. राजमाता जिजाबाईंचे पाच पुत्र मृत्यूमुखी पडले होते. एकटे शिवाजी महाराज जगले आणि त्यांच्यावरही अनेक संकटे ओढावत होती; पण तशाही स्थितीत मन कठोर करून त्या शिवरायांना यशस्वी होण्याचे आशीर्वाद देत होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी आग्रा येथे जातांना सर्व राज्यकारभार जिजाऊंच्या स्वाधीन केला होता. जिजाबाई या केवळ माताच नव्हे, तर छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरक शक्तीही होत्या. शिवरायांच्या राज्याभिषेकाचा सुवर्णाचा क्षण पाहिल्यानंतर अवघ्या बारा दिवसांतच वर्ष १६७४ मध्ये त्यांनी पाचाड येथे देह ठेवला. अशा जिजाऊंमुळे महाराष्ट्राला शिवराय लाभले आणि त्यामुळे हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली. स्वतः समर्थ रामदासस्वामी यांनी जिजामाता यांना 'आईसाहेब' असे संबोधले होते. शेवटच्या क्षणात जिजाऊंनी समर्थांना 'शिवबाचे दायित्व आता आपले. त्याला सांभाळा', असे विनवले, तेव्हा गंभीर मुखाने समर्थ म्हणाले, "आई ! हे दायित्व पेलण्याचे सामर्थ्य आमचे नाही. प्रत्यक्ष सूर्य जर आमच्या हाती दिला, तर तो पेलणार कोण ? ती योग्यता तुमची होती. ती तुम्ही पार पाडली." असे सांगून समर्थ त्या थोर मातृत्वाचे दर्शन घडवतात.

'साधू-संतांनीही ज्यांची महती वर्णावी, अशा त्या थोर पुण्यात्माच असल्या पाहिजेत', याची निश्चिती पटते. स्वराज्य स्थापनेच्या प्रारंभी राजांनी रोहिडेश्वर घेतला, त्यानंतर ते रोहिडेश्वराला भेट देण्यासाठी निघाले, त्या वेळी मासाहेबांनी त्यांना बारीक बारीक तपशील विचारले. तुम्ही गावात आधी वर्दी दिलीय का? कुठे वस्ती करणार? तुमच्यासमवेत येणाऱ्या फौजफाट्याचे काय? त्यांच्या खाण्यापिण्याचे कोण बघणार? जनावरांच्या दाणापाण्याचे कोण पहाणार? 'तुमच्यामुळे त्या गावाला नाहक त्रास नको व्हायला', असे म्हणून त्यांनी राजांसह फौजेसाठी शिधा आणि जनावरांचे वैरण पाठवले. पुढे राजांनी तीच पद्धत कायम ठेवली, त्यामुळे रयतेला कधीच त्रास झाला नाही. जे संकट सहन करतात, त्यांचाच भविष्यकाळ उज्ज्वल असतो. या जगात माणसाचा मोठेपणा कर्तृत्वापेक्षा सोसण्यावर आहे. ज्यांनी सोसले, त्यांनाच भवानीचा आशीर्वाद मिळाला. तेव्हा भवानीच्या आशीर्वादावर विश्वास ठेवा." हिंदवी स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी छत्रपती शिवरायांना ज्ञान, चारित्र्य, चातुर्य, संघटन, पराक्रम, अशा सात्त्विक अन् राजस गुणांचे बाळकडू देणाऱ्या राजमाता होत्या. अशा या पुण्यात्म्याला त्रिवार वंदन आणि शतकोटी प्रणाम !'

**– मोक्षदा घाणेकर**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ जानेवारी

१) श्रीम. वसुधा वसंत साळवी अलिबाग, १२-१-१९५१

२) श्री. दत्ताराम बाळाराम राऊत मापगाव, १२-१-१९६०



## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचाफोटोकृषीवलमध्येछापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**कै. लता जयवंत म्हात्रे, स्मरणार्थ, उरण नागाव**


# मुंबई-गोवा महामार्गासाठी एल्गार

## • सोनवी पुलाजवळ महामार्ग ठप्प



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम हा केवळ विकासाचा प्रश्न राहिलेला नसून तो आता कोकणवासीयांच्या संयमाची परीक्षा घेणार ठरत आहे. तब्बल १७ वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत असलेल्या महामार्गामुळे रोज अपघात, मृत्यू, आर्थिक नुकसान आणि मानसिक त्रास सहन करणाऱ्या जनतेचा संताप उफाळून आला. या अन्यायाविरोधात जन आक्रोश समितीच्या वतीने संगमेश्वर येथील सोनवी पुलाजवळ जोरदार रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

आता पुरे झाले, अजून किती बळी? असा सवाल करत नागरिक रस्त्यावर उतरले. रखडलेले काम तातडीने पूर्ण करण्याचे ठोस आणि लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली.

आंदोलनादरम्यान वातावरण प्रचंड तणावपूर्ण झाले होते. शासन आणि संबंधित यंत्रणांच्या उदासीनतेविरोधात संताप व्यक्त करत आंदोलकांनी प्रतिकात्मक तिरडी यात्रा काढली. हा महामार्ग म्हणजे मृत्यूमार्ग बनत असल्याचा वास्तव यातून मांडण्यात आले. आंदोलनामुळे सलग एक तास महामार्ग पूर्णपणे ठप्प राहिल्याने दोन्ही बाजूंना वाहनांच्या किलोमीटरभर रांगा लागल्या. महामार्गावरील वाहतूक ठप्प झाल्याने प्रवासी, रुग्णवाहिका, मालवाहतूक वाहनांचे हाल झाले. मात्र आंदोलकांनी यासाठी प्रशासनालाच जबाबदार धरले. वेळेवर काम झाले असते, तर आज रस्त्यावर उतरायची वेळ आली नसती, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. परिस्थिती चिघळत असल्याचे लक्षात येताच उपविभागीय अधिकारी निलेश माईनकर आणि पोलीस निरीक्षक राजाराम चव्हाण घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र नेहमीप्रमाणे आश्वासनांची पोकळी आणि ठोस कालमर्यादेचा अभाव पाहता आंदोलक अधिक आक्रमक झाले. त्यामुळे घटनास्थळी मोठ्या प्रमाणात हाय व्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला.

निवडणुकीच्या वेळी कोकण आठवतो, पण नंतर विसर पडतो. आमचे जीव स्वस्त आहेत का? असा थेट सवाल आंदोलकांनी प्रशासनाला केला. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या दिरंगाईमुळे अपघातात गेलेले जीव, उद्ध्वस्त कुटुंबे आणि उद्ध्वस्त अर्थकारण यासाठी जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला.या आंदोलनातून स्पष्ट इशारा देण्यात आला असून महामार्गाचे काम त्वरित सुरू न झाल्यास आंदोलनाची तीव्रता वाढवण्याचा निर्धार केला आहे.

## रानडुक्कर धडकल्याने कारला अपघात

**वाडा** : वाडा-देसई-तिळसे मार्गावर सोनशिव फाट्याजवळ रानडुक्कर समोर आल्याने कार उलटली होती. या अपघातात तिळसे येथील व्यावसायिकाचा घटनास्थळावरच मृत्यू झाला आहे. तिळसे येथील व्यावसायिक नीलेश वेखंडे (वय ४३) शुक्रवारी रात्री आठच्या सुमारास स्वतःच्या चारचाकीतून वाड्याकडे येत होते. सोनशिव फाट्याजवळ त्यांच्या गाडीसमोर अचानक रानडुक्कर आले. यावेळी कारची जोरदार धडक बसल्याने रस्त्यावरच कार उलटली होती. यात नीलेश यांचा घटनास्थळावरच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

# एसटीतून कोकण दर्शनाची संधी

## • माघी गणेशोत्सवानिमित्त महामंडळाच्या पालघर विभागाचा उपक्रम

**| पालघर | प्रतिनिधी |**

एसटीच्या पालघर विभागाकडून गणेशभक्तांसाठी कोकण दर्शन यात्रा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. माघी गणेशोत्सवानिमित्त कोकणातील वैभव आणि धार्मिक स्थळांची सफर करण्याची संधी जिल्हावासीयांना मिळणार आहे.

> **समूह योजनेसाठी हा उपक्रम असून, जिल्ह्यातील भाविकांना सुरक्षित, सुखकर आणि स्वस्त दरात सेवा देणे, एसटीचे कर्तव्य आहे.**
>
> **– कैलास पाटील, विभाग नियंत्रक, पालघर विभाग**

गणेश जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पालघर विभागाने पर्यटक आणि भाविकांसाठी कोकण दर्शन पॅकेज टूरची विशेष पर्वणी आणली आहे. पालघर, सफाळे, वसई, अर्नाळा, डहाणू, जव्हार, बोईसर आणि नालासोपारा अशा आठ आगारांतून कोकण दर्शनाकरिता या बस निघणार आहेत. किमान ४० प्रवाशांचा गट तयार झाला, तर त्या गटासाठी एसटीमार्फत बससेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना राज्य शासनाच्या सवलतींचा पूर्ण लाभ मिळणार आहे. या पर्यटनस्थळांना भेट मुरूड-जंजिरा, रायगड किल्ला संगमेश्वर, मार्लेश्वर (गुहेतील शिवमंदिर), गणपतीपुळे अशा देवस्थानांच्या यात्रेचे नियोजन आहे. बसचा मार्ग मुरूड जंजिरा - माणगाव - रायगड- संगमेश्वर - मार्लेश्वर - गणपतीपुळे आणि परतीचा प्रवास असा असणार आहे.

**तिकीटदर (प्रति प्रवासी)**

| आगार | पुरुष | सवलतदार (योजना) |
|---|---|---|
| वसई | २,०११ | १,००६ |
| नालासोपारा | २,०११ | १,००६ |
| अर्नाळा | २,०७१ | १,०३६ |
| पालघर | २,४४५ | १,२२३ |
| बोईसर | २,४६५ | १,२३३ |
| जव्हार | २,४६२ | १,२३१ |
| सफाळे | २,४२५ | १,२१ |
| ३डहाणू | २,५१५ | १,२५८. |

# सिकलसेल मुक्तीसाठी १५ जानेवारीपासून अभियान

## • ७ फेब्रुवारीपर्यंत तपासणी व जनजागृती

**| रायगड | प्रतिनिधी |**

जिल्ह्यात सिकलसेल ॲनिमिया या आनुवंशिक आजाराचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने आरोग्य विभाग सज्ज झाला असून आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान' राबविण्यात येणार आहे.

या विशेष अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील ४० वर्षांपर्यंतच्या सर्व नागरिकांची प्राथमिक सिकलसेल तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीदरम्यान संशयित रुग्ण व वाहकांची नोंद घेऊन आवश्यकतेनुसार एचपीएलसी किंवा इलेक्ट्रोफोरेसिस या प्रगत तपासण्या केल्या जाणार आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण जिल्हा आरोग्य यंत्रणा या अभियानासाठी सज्ज झाली आहे. जिल्हा व उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे तसेच आयुष्यमान आरोग्य मंदिरांमध्ये आवश्यक मनुष्यबळ व तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अभियानादरम्यान ४० वर्षांपर्यंतच्या नागरिकांची प्राथमिक तपासणी केली जाईल. संशयित रुग्णांची सखोल तपासणी करून त्यांना औषधोपचार, समुपदेशन व आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन दिले जाणार आहे. भावी पिढीला या आजारापासून सुरक्षित ठेवण्यासाठी विवाहपूर्व व प्रसूतीपूर्व समुपदेशनावर विशेष भर देण्यात येणार आहे.

अभियान यशस्वी करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती उपक्रम, प्रश्नमंजुषा, रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच बॅनर, पोस्टर्स, सोशल मीडिया, गृहभेटी यांद्वारे सिकलसेल ॲनिमियाबाबत व्यापक जनजागृती केली जाणार आहे.

## आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

उरण: शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मदिनानिमित्त उरण शिवसेना (शिवसेना गट) म्हातवली शाखा (तालुका उरण ) यांच्या वतीने ओएनजीसी गेट,नाईक नगर झोपडपट्टीसमोर ठाकूर नगर साई दर्शन सोसायटी येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या मोफत आरोग्य शिबिरात सुमारे १९० रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन करण्यात आले. मोफत आरोग्य शिबिराचे निमंत्रक म्हातवली शाखा प्रमुख संदेश म्हात्रे होते. या शिबिरास एमजीएम कामोठे हॉस्पिटलचे डॉक्टरांनी तपासणी करून मार्गदर्शन केले. शिबिरात अस्थी रोग, बालरोग, नेत्र रोग, नाक, कान, घसा, शल्य चिकित्सा, चर्म रोग, हृदय विकार, दंत चिकित्सा आदींची तपासणी करण्यात आली.

## बसस्थानकातील काम केले पूर्ण

**तळा** : शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या पाहणीनंतर संबंधित ठेकेदाराकडून तळा बसस्थानकाच्या पीओपीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.दोन वर्षांपूर्वी तळा बसस्थानक दुरुस्तीच्या कामासाठी दहा लक्ष रुपये निधी खर्च करण्यात आला होता. या दुरुस्तीमध्ये बसस्थानकाला बसविण्यात आलेली पिओपी शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास अचानक कोसळली व यामध्ये मांदाड येथील प्रवासी किरकोळ जखमी झाला होता.

# राज्यातील रस्त्यांवर ८६९ अपघाताचे ब्लॅकस्पॉट

**| रायगड | प्रतिनिधी |**

राज्यातील रस्त्यांची दुरवस्था दिवसेंदिवस वाढत असल्याने अपघातांचे प्रमाणही वाढत आहे. रस्त्यांच्या देखभालीअभावी ब्लॅकस्पॉटचे प्रमाणही वाढत आहे. राज्याच्या गृह विभागाच्या आकडेवारीनुसार राज्यातल्या ३६ जिल्ह्यांमधील रस्त्यांवर तब्बल ८६९ ब्लॅकस्पॉट असल्याची आकडेवारी पुढे आली आहे.

राज्यात या वर्षी जानेवारी ते नोव्हेंबर या कालावधीत राज्यात एकूण ३३ हजार २ अपघात झाले असून, त्यामध्ये १४ हजार ६६ जणांचा मृत्यू झाला आहे. मागील वर्षी याच कालावधीत ३२ हजार ७८४ अपघातांमध्ये १४ हजार १८५ मृत्यू झाले होते.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर जानेवारी ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत ८२ अपघाती मृत्यू झाले, तर २०२५ मध्ये या महामार्गावर अपघातात ६१ जणांचा मृत्यू झाला आहे.३६ जिल्ह्यांमध्ये एकूण २१ हजार ४०० किमी लांबीचे रस्ते आहेत. या रस्त्यांवर ८६९ ब्लॅकस्पॉट आहेत. या अपघातप्रवण क्षेत्रातील अपघात कमी करण्यासाठी एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली उपाय योजण्यात येणार आहेत.

# मकर संक्रांतीसाठी हलव्याच्या दागिन्यांना मागणी

**| पनवेल | प्रतिनिधी |**



मकरसंक्रांत जवळ आली की महिलांना वेध लागतात ते संक्रांतीच्या हळदीकुंकू समारंभाचे. तर नववधूंना प्रतीक्षा असते ती पहिल्या संक्रांत सणाची. त्यासाठी हलव्याच्या दागिन्यांचा साज केला जातो. अवघ्या काही दिवसांवर मकरसंक्रांत सण आला आहे. त्यासाठी हलव्याच्या दागिन्यांना मागणी वाढल्याचे दिसून येत आहे.

लग्नानंतरच्या पहिल्या संक्रांतीला मुलीच्या सासरी संक्रांत सणाचे वाण घेऊन जाण्याची प्रथा विविध शहरांमध्ये आहे. यासाठी हलव्याचे विविध दागिने घेण्यासाठी पनवेल शहरातील व परिसरातील विविध दुकानांमध्ये हलव्यांचे दागिने विक्रीस उपलब्ध झाले आहेत. हलव्यापासून तयार करण्यात येणाऱ्या दागिन्यांमध्ये मंगळसूत्र, बांगड्या, तनमणी, कुड्या, राणीहार, हार, अंगठी, बाजूबंद, तोडे, शाहीहार, चापाची नथ यासारखे महिलांच्या दागिन्यांचे विविध सेट उपलब्ध आहेत. महिलांप्रमाणे नवविवाहीत पुरुषांसाठीही हार, गुच्छ, पेन, मोबाइल केस, घड्याळ तसेच पाच प्रकारचे हलवे, कापडी हत्ती यासारख्या हलव्याच्या वस्तू बाजारात उपलब्ध आहेत. संक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत नवविवाहीत जोडप्यांचा पहिला संक्रांत सण साजरा केला जात असल्याने या दागिन्यांना मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याचे विक्रेते सांगतात. साधारणत थंडी पडायला सुरूवात झाली की हलव्याचे दागिने बनवण्याचे काम सुरु होते. हवामानातील बदल, साखरेचे दर यावर या २००० दागिन्यांच्या किंमती अवलंबून असतात. पण मात्र एक किंमत निश्चित झाल्यावर मात्र त्यात आम्ही काही बदल करत नसल्याचे त्यांनी सांगितले. हलव्याच्या दागिन्यांचे नाजूक कलाकुसर असते त्यामुळे दागिन्यांमधील एक जरी हलवा निघाला तरी संपूर्ण दागिना होत असल्याचे विक्रेते सांगतात. त्यासाठी या दागिन्यांची हाताळणी नाजूकपणे करावी लागत असल्याचे ते सांगतात. संक्रांतीचे औचित्य साधून लहान मुलांचं आणि मुलींचं बोरन्हाण केलं जातं. त्यासाठी काळं झबलं, कपडे घालून बाळाला हलव्याचे विविध दागिने परिधान केले जातात. या दागिन्यांमध्ये मुलींसाठी मुकूट, बाजूबंद, गळ्यातला हार, कंबरपट्टा, राधासेट तर मुलांसाठी कृष्ण सेट उपलब्ध झाला आहे.

**तुडतुड्यांच्या प्रादुर्भावाने बागायतदार चिंतेत** | **ढगाळ वातावरणामुळे पिकावर कीड**

# यंदाही आंब्याचा हंगाम कसोटीचाच

**| पालघर | प्रतिनिधी |**



सध्या जिल्ह्यात आंब्याच्या झाडाला मोहोर येण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. पुढील काही दिवसांतच परिपूर्ण मोहोर येण्याची शक्यता आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी वर्तविली होती. परंतु अचानक जिल्ह्यात बदललेले हवामान बदल आणि पावसाची शक्यता असल्याने शेतकऱ्यांसमोर यंदा आंब्याचा हंगामही कसोटीचाच ठरणार आहे. तसेच ढगाळ वातावरणामुळे पिकावर कीड व रोगांची समस्या जाणवत आहे. यंदा पाऊस उशिरापर्यंत राहिल्याने रब्बीचा हंगामही लांबणीवर गेला आहे.

आंब्याच्या फळबागेत सध्या करपा आणि तुडतुडे यांचा प्रादुर्भाव जाणवत असून, नवीन मोहोर जळण्यास सुरुवात झाली आहे. लांबलेल्या पावसामुळे यंदा मोहोर उशिरा येत असून, त्यातच बदलत्या हवामानाचा फटका बसल्यास एकंदरीत आंबा उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे, असे येथील आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर कीड रोग सर्वेक्षण सल्ला व व्यवस्थापन प्रकल्पअंतर्गत शेतकऱ्यांच्या बागांना भेटी देण्यात येत आहेत. यादरम्यान कीटकशास्त्रज्ञ डॉ. अंकुर ढाणे आणि संशोधन सहयोगी योगेश मेंगे यांनी उपाययोजना करण्याचा सल्ला दिला आहे. त्यानुसार आंबा पिकावर १० तुडतुडे प्रति पालवी किंवा मोहोर याप्रमाणे आर्थिक नुकसान पातळी अधिक आढळल्यास तत्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे डॉ. अंकुर ढाणे यांनी सांगितले. एकात्मिक व्यवस्थापनकिडीचे एकात्मिक व्यवस्थापन करताना झाडांची योग्य छाटणी करून बागेत हवा आणि सूर्यप्रकाश खेळता राहील याची विशेष काळजी घ्यावी. बाग तणमुक्त व स्वच्छ ठेवावी. नत्रयुक्त खतांचा अतिरिक्त वापर टाळून आंबा पिकाचे संतुलित खत व्यवस्थापन करावे, असा सल्ला शास्त्रज्ञांनी दिला आहे.

आंब्यावर आढळणारी तुडतुड्यांची पिल्ले, प्रौढ किडे पाने, मोहोर व लहान फळांमधून रस शोषून घेतात. त्यामुळे फुलकळ्या व फुले कोमेजून गळून पडतात. नुकतीच लागलेली लहान फळेही मोठ्या प्रमाणावर गळतात. किडीच्या चिकट गोड स्रावावर काळी बुरशी वाढून प्रकाश संश्लेषणात अडथळा निर्माण होतो.

> माझ्या आंबा फळबागेत आंबा पिकावर तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव दिसत आहे. सध्या प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा कमी आहे. कोकण कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी बागेस भेट देऊन तुडतुडे किडीने आर्थिक नुकसान संकेत पातळी ओलांडल्यास करावयाच्या उपाययोजना सांगितल्या आहेत.
>
> – प्रकाश घरत, आंबा बागायतदार, नवली, पालघर.

## निवडक



### नंदीबैलाची गावोगावी भटकंती

**मुरूड-जंजिरा** : लोकसंस्कृतीचे निखळत चाललेले घटक आजही गावोगाव भटकंती करताना दिसत आहेत. भटके फिरस्ते दरवर्षी सुगीच्या हंगामात गल्लोगल्ली फिरस्ती करतात. अशा भटक्या जमातीतील लोकांचे 'गुबूगुबू' या लोकगीताचे बोल वाजवित हे गावोगाव हजेरी लावताना दिसत आहेत. नंदीबैल समाजातील महिला सुया, पिना, दाभण, दातवण, कुंकू, काळं मणी, कंकवा, फणी विक्री करतात. मात्र, बदलत्या काळानुरुप त्यांचा हा फिरता विक्री व्यवसाय आज संकटात सापडला आहे. आता केवळ नंदीबैल सोबत घेऊन हे फिरस्ते आपला उदरनिर्वाह करतात.पूर्वीच्या काळात करमणूक साधने खूप कमी होती. त्यावेळी लोकांचे मनोरंजन करणारे हे फिरस्ते हवे हवेशे वाटत. काळ बदलला, बदलत्या काळाबरोबर करमणुकीची साधने बदलली. रेडिओ, टीव्ही आली, टेपरेकॉर्डर वाजू लागले, पडद्यावर चित्रपट आले आणि मोबाईल आला. त्यामुळे लोकसंस्कृतीचा हा मुख्य घटक हद्दपार होण्याची स्थिती आहे. बैल म्हणजे महादेवाचे वाहन आणि शेतकऱ्यांचा सोबती. मात्र, औद्योगिकीकरणाने या बैलांची संख्या कमी होत चालली आहे. आणखी काही वर्षांनी हा नंदी 'पूर्वी औत ओढायचा' हे पुढल्या पिढीला सांगावे लागणार, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.




### पंधरा दिवसांत काँक्रीट निखळले

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील कल्याण-कर्जत रस्त्यावरील आंबिवली फाटापासून आंबिवली गाव आणि तेथून एकसल गावाकडे जाणारा रस्ता काँक्रीटचा बनविला जात आहे. या रस्त्याचे काम अनेक महिन्यांपूर्वी सुरु झाले होते. त्यानंतर रस्त्याच्या काँक्रिटीकरणाला सुरुवात झाली. परंतु, या रस्त्यावर काँक्रिटीकिरण करण्यासाठी टाकण्यात आलेले सिमेंट निघून जात आहे. त्यामुळे या कामाची शासनाने चौकशी करण्याची मागणी स्थानिक आंबिवली गावातील ग्रामस्थांनी केली आहे. कल्याण-कर्जत राज्यमार्ग रस्त्यावरून आंबिवली गावाकडे जाणारा रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्याचे काम मंजूर झाले आहे. या रस्त्यावर ५ कोटी खर्चून रस्ता बनविला जाणार आहे. या रस्त्याचे राज्यमार्ग रस्त्यापासून आंबिवली गावापर्यंत आणि तेथून एकसलकडे जाणारा रस्ता काँक्रीटचा बनविला जात आहे. या कामाला २०२५मध्ये मंजुरी दिली होती. त्यानंतर मागील महिन्यापासून रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली असून ठेकेदाराकडून कासवगतीने काम पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्यातही काही ठिकाणी रस्ता रुंद तर काही ठिकाणी अरुंद असे काम सुरु आहे. त्याचवेळी रस्त्याचे बांधकाम केल्यावर पाण्याचा वापर केला जात नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दुसरीकडे या रस्त्यावर काँक्रीट कामामधील जेसीबी हे अनेक ठिकाणी रस्त्यावर निखळले आहे. त्यामुळे नित्कृष्ट दर्जाचे काँक्रिटीकरण करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत.



### ममदापुर वाडी रस्त्याची धूळधाण

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील ममदापुर वाडीकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करण्यात आला आहे. या रस्त्याची गेल्या पाच वर्षांपासून दुरवस्था झाली होती आणि त्यानंतर हा रस्ता डांबरीकरण करण्यात आला आहे. मात्र, रस्त्याची अवघ्या १५ दिवसांत धूळधाण झाली असून निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण केल्याने या रस्त्याची हि अवस्था झाली असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. नेरळ विकास प्राधिकरण हद्दीत असलेल्या ममदापुर ग्रामपंचायतमधील ममदापुर वाडीकडे जाणाऱ्या २ किलोमीटर लांबीच्या रस्त्याची अवस्था दयनीय झाली होती. रस्त्यातील खड्डे आणि पावसाळ्यात त्या खड्ड्यात साठणाऱ्या पाण्यामुळे या रस्त्याची अवस्था दयनीय झाली होती. स्थानिक आदिवासी लोकांनी अनेक वर्षे रस्त्याचे डांबरीकरण व्हावे, अशी मागणी केली होती. मात्र, रस्त्यावर काँक्रिटीकरण करावे, अशी मागणी प्राधिकरणाकडे केली जात होती. परंतु, रस्त्याची अवस्था पाहता प्राधिकरणाने चक्क तेथे डांबरीकरण केले आहे. त्यातही डांबरीकरण कामाचा दर्जा निकृष्ट असल्याने अवघ्या १५ दिवसात डांबर बाहेर आले आहे.



### आठवडा बाजार म्हणजे जनतेला वरदान

**सुतारवाडी** : विळे येथे पावसाळ्यानंतर दर बुधवारी आठवडा बाजार भरतो. त्यामुळे हा बाजार परिसरातील असंख्य नागरिकांना वरदान ठरला आहे. विळे वरची वाडीचे सरपंच परशुराम कोदे यांनी सांगितले की, येथील आठवडा बाजाराची गेल्या सोळा वर्षांपासून अखंड अशी परंपरा आहे. पाटणूस, रवाळजे, साजे, विले, भागाड, भाले, सणसवाडी सह तासगाव, भिरा, कोलाड, सुतारवाडी, रोहा, माणगाव, पाली, सुधागड या परिसरातील असंख्य नागरिक येथील बाजाराचा लाभ घेतात. कांदे, बटाटे, कडधान्य, विविध प्रकारचे रेडिमेड कपडे, अनेक प्रकारची फळे, लहान मुलांची खेळणी, भाजीपाला, सुकी मासळी सुद्धा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असते. या बाजारामध्ये रायगड जिल्ह्यातील अनेक तालुक्यांतील लहान मोठे व्यापारी हजेरी लावत असतात.

# पद्मदुर्गावर अवतरली शिवशाही

## ।। शेकडो शिवप्रेमीच्या उपस्थित जागर सोहळा संपन्न ।। मर्दानी खेळ व तलवारबाजी पाहून पर्यटक भारावले

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरूड पद्मदुर्ग जागर व गड भ्रमण सामाजिक संस्था, कोकण कडा मित्र मंडळ रायगड व सर्व संलग्न शिवप्रेमी संस्थांच्या वतीने आज १७ वा पद्मदुर्ग जागर सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या शिवशाही सोहळ्या करिता पर्यटकांसह शेकडो शिवप्रेमी यांनी पद्मदुर्ग किल्ल्यावर हजेरी लावली. यावेळी सकाळी शिवप्रेमी यांनी डोक्यात भगवे फेटे घालून मुरुड राधाकृष्ण मंदिरा पासुन शिवपालखीला सुरुवात करण्यात आली.

राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज की जय जयभवानी जय शिवाजी, हर हर महादेव, कोटेश्वरी मातेच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता ही पालखी खोरा बंदरा पर्यत आणण्यात आली. त्यानंतर बोटीने पालखी पद्मदुर्ग किल्लात आणण्यात आली. सकाळपासून शिवप्रेमी यांनी किल्ल्यात येऊन पुन्हा किल्ला स्वच्छ व चकाचक करण्यात आला.त्यानंर संपुर्ण गडाला फुलांने सजवले. ठिकठिकाणी भगवे झेंडे लावण्यात आले.यामुळे भगवेमय वातावरण तयार झाले होते.

सकाळी ०९.३० वाजता अच्युत चव्हाण व त्यांच्या पत्नी अनुराधा चव्हाण यांच्या शुभ हस्ते गडाची श्री. कोटेश्वरी मातेची पूजन करण्यात आले. डॉक्टर मयुर कल्याणी व त्यांच्या पत्नी डॉक्टर भाविका कल्याणी यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. व शिवप्रतिमेला मुद्रांचा अभिषेख करण्यात आले. मंत्राच्या घोषणेने संपूर्ण परिसर दणाणून गेला. सारे वातावरण शिवकालीन झाले होते. हजारो श्रोते कानी पडणारे मंत्र व व्याख्यान अगदी मन लावून ऐकत होते.



इतिहास अभ्यासक प्रतिक कालगुंडे यांनी शिवरायांची राजनीती व सर्वसमभाव सर्व जातीचे मावळे घेऊन स्वराज्य घडवले ते कसे त्यांच्या व्याख्यानात सांगितले. तसेच शिवरायांच्या राजनीती बाबत या चित्तथराक कथा सांगून शिवरायांचे मावळे बाजीप्रभू देशपांडे यांनी पावनखिंड स्वराज्यासाठी कशी लढवली, याचे रोमहर्षक वर्णन करून शिवप्रेमीना एक नवा जोश निर्माण केला. तद्नंतर शिवप्रेमींनी विविध शिवकालीन शौर्याचे खेळ बाणापट्टा, तलवारबाजी, मल्लखांब, पारंपरिक गोंधळ सादर करण्यात आला.

यावेळी माजी आमदार अनिकेत तटकरे, मुरूड पद्मदुर्ग जागर व गडभ्रमण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आशिलकुमार ठाकुर, राजपुरोहित प्रकाश स्वामी जंगम, राहुल कासार, रुपेश जामकर, डॉक्टर मयुर कल्याणी, डॉक्टर भाविका कल्याणी, कोकण कडा मित्र मंडळ रायगड शेखर फरमन, रोहित पवार, उपाध्यक्ष संकेत वडके, सुरेश पवार, अनिकेत कदम, प्रकाश दाभेकर , विजय वाणी, प्रदिप बागडे, महेंद्र मोहिते, संदिप घरत, नेहा पाके, बाळा साखरकर, मिलिंद भगत, महेश साळुंखे, प्रविण पाटील, रुपेश रणदिवे, अच्युत चव्हाण, अनुराधा चव्हाण, अमित पाटील, सतेज विरकुड, प्रकाश वाडकर आदिंसह शिवप्रेमी उपस्थित होते.

यावेळी माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, राज्य सरकार व केंद्र सरकार अरबी समुद्रात नवीन छत्रपती शिवाजी महाराजाचे स्मारक उभे करत आहेत. त्याच्यापेक्षा महाराजांना मानवंदना द्यायची असेल तर मुरूड येथील समुद्रात असणारा महाराजांचा जीवंत पद्मदुर्ग किल्ल्याचे जतन व संवर्धन करा असे आवाहन केले. मुरूड पद्मदुर्ग जागर व गड भ्रमण सामाजिक संस्था, कोकण कडा मित्र मंडळ रायगड व सर्व संलग्न शिवप्रेमी संस्थांच्या वतीने पद्मदुर्ग सोहळा गेली १७ वर्ष करित आहेत. या सोहळ्याच्या माध्यमातून गड किल्ल्यांचे संवर्धन व जतनासाठी विशेष प्रयत्न करत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे ज्या वास्तू आहेत. त्या पुढच्या पिढी पर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न ही करतात त्यांना मानाचा मुजरा. किल्ल्याचे संवर्धन व जतन करण्याकरिता मी शिवभक्त म्हणून अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. शिवभक्तांचा मार्ग सुकर व्हावा, यासाठी प्रवासी जेट्टी पावसाळ्यादरम्यान सुध्दा शिवभक्त येथे कसे येतील त्याकरिता आम्ही प्रयत्न करणार आहे. मुरुड शहरात ही भव्य महाराजांचा स्मारक बांधा तसेच पद्मदुर्ग किल्ला शिवाजी महाराज व संभाजी महाराजांचे स्मारक या ठिकाणी झाले पाहिजे. त्यासाठी सरकारला विनंती करणार आहोत, असे माजी आमदार अनिकेत तटकरे म्हणाले.

## गावोगावी मैदान हे माझे मिशन : महेंद्र घरत

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

विमानतळबाधित उलवे, तरघर, कोंबडभुजे या गावांनाही संयुक्तरित्या साडेसहा एकरचे मैदानही मिळेल. सध्या खेळाचे मैदान असे आरक्षण टाकले आहे. इतर सोपस्कार पार पडल्यावर त्यांना ते अधिकृतरित्या मैदान मिळेल. मी माझ्या परिने गावोगावी मैदान हे मिशन घेऊन काम करीत आहे, असे महेंद्र घरत म्हणाले.

सिडकोने अनेक गावांच्या हजारो एकर गुरचरण जमिनी गिळंकृत केल्या. पूर्वी गावोगावचे तरुण याच मैदानांवर खेळायचे. गेल्या १५ वर्षांपासून सिडकोसोबत पाठपुरावा करून मी शेलघर, मोरावे, गव्हाण, कोपर आदी गावांना अधिकृतरित्या मैदाने मिळवून दिली आहेत. कर्नाळा स्पोर्टस, रामशेठ ठाकूर स्पोर्टस कॉम्प्लेक्स यांच्या उभारणीत आपला सिंहाचा वाटा आहे.

सेझच्या नावाखाली उरण तालुक्यातील बहुसंख्य मैदाने सिडकोने घशात घातली आहेत. प्रकल्पग्रस्तांच्या गावांना अद्यापही सिडकोने मैदाने दिलेली नाहीत. त्या गावांच्या मैदानांसाठी कोणी प्रयत्न केले का, परंतु मी हार मानलेली नाही. भूमिपुत्रांसाठी, दिबांचे कार्य पुढे नेण्यासाठी सिडकोसोबत लढतोय. भूमिपुत्र तरुणांनीही वेळप्रसंगी रस्त्यावर यायची तयारी ठेवावी, असे आवाहन महेंद्र घरत यांनी केले.

## ज्येष्ठ पत्रकार रमेश भोळे यांना 'इंटरनॅशनल अचिव्हर्स अवॉर्ड'प्रदान

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारिता क्षेत्रात गेली तीन दशके अविरत सेवा बजावणारे ज्येष्ठ पत्रकार आणि साप्ताहिक रसायनी टाइम्सचे संस्थापक सहसंपादक रमेश भोळे यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. नाशिक येथील दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात भोळे यांना मानाच्या इंटरनॅशनल अचिव्हर्स अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

रमेश भोळे हे गेल्या ३० वर्षांपासून प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून कार्यरत आहेत. केवळ बातम्या देणे एवढ्यापुरते मर्यादित न



राहता, त्यांनी आपल्या लेखणीतून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न, रसायनी-पनवेल परिसरातील समस्या आणि सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. त्यांच्या या निर्भिड आणि सामाजिक भान जपणाऱ्या पत्रकारितेची दखल घेत त्यांची या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

शिर्डी येथील हॉटेल शांती कमल येथे हा पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून साईबाबा संस्थान, शिर्डीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्षक गाडीलकर आणि जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन ज्येष्ठ पत्रकार महेंद्र देशपांडे यांनी केले होते. यावेळी व्यासपीठावर संत अवधूत गिरी, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष पंढरीनाथ पगार यांसह पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते. रमेश भोळे यांच्यासह महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या इतर ५० गुणवंतांचाही गौरव करण्यात आला.

पुरस्कार स्वीकारताना उपस्थितांनी रमेश भोळे यांचे टाळ्यांच्या कडकडाटात अभिनंदन केले. पत्रकारिता हे एक व्रत आहे आणि भोळे यांनी ३० वर्षांपासून निष्ठेने जपले आहे, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. या मुख्य पुरस्काराव्यतिरिक्त, रमेश भोळे यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघानेही पुढाकार घेतला.

## पालकांसह शासनाची फसवणूक करणाऱ्या शाळेवर कारवाईची मागणी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी-मोहोपाडा येथील एका शाळेत गैरव्यवहार सुरू असून, शाळा अनुदानित असतानाही विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीरपणे फी वसूल करून शासन आणि पालकांची फसवणूक केली जात असल्याचा गंभीर आरोप संस्थेचे कार्याध्यक्ष अरुण शांताराम गायकवाड, आकाश कांबळे यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

शाळेची सध्याची इमारत अत्यंत धोकादायक अवस्थेत असून विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका आहे. म्हणजे, कागदोपत्री शाळेला परवानगी पराडे वाडी येथील दोन खोल्यांसाठी असताना, शाळा प्रत्यक्षात मोहोपाडा येथे विनापरवाना चालवली जात आहे. वाढीव तुकड्यांनाही कोणतीही परवानगी नसताना शाळा बेकायदेशीरपणे सुरू असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

संस्थेने आदिवासी विद्यार्थ्यांनाही मोफत शिक्षणापासून वंचित ठेवले जात आहे. समाजाची फसवणूक टाळण्यासाठी गायकवाड यांनी धर्मादाय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे.

या पार्श्वभूमीवर, संबंधित केंद्रप्रमुख ते शिक्षणाधिकारी यांच्यावरही जबाबदारी निश्चित करून, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर फसवणुकीचे गंभीर गुन्हे दाखल करावेत आणि विद्यार्थ्यांकडून घेतलेली फी व्याजासहित परत करावी; अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा अरुण गायकवाड, आकाश कांबळे यांच्यासह अरविंद पाटील, विजय खारकर, आशिष जाधव तसेच काही पालकांनी दिला आहे.

## निवडणुकांचा मुहूर्त लांबणीवर?

**आगरदांडा :** राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती च्या निवडणुकीची आचारसंहिता मागील आठवड्यात लागणं अपेक्षित होतं मात्र राज्य निवडणूक आयोग कडुन कोणतीही हालचाल होताना दिसत नसल्याने या निवडणूकीचा मुहूर्त लांबणीवर जाण्याची शक्यता दिसत असल्याने इच्छुक उमेदवारांचा हिरमोड होताना दिसत आहे. निवडणुका या महिन्यात होणार की नाही हा प्रश्न सर्व राजकीय पक्षांना पडला असून निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेकडे लक्ष लागले आहे.

### नगरसेवक प्रशांत कडू आयोजित
## मोफत आरोग्य शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहा नगर पालिकेचे माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे व माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्षा वनश्री शेडगे व सर्व सहकारी नगरसेवक यांच्या संयोगाने अष्टमी येथील नगरसेवक प्रशांत कडू यांच्या पुढाकारातून पांडुरंग शास्त्री आठवले विद्यामंदिर अष्टमी शाळा क्रमांक ३ येथे रविवारी ( दि.११) रोजी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन गटनेते महेंद्र गुजर यांच्या हस्ते झाले. या शिबिरात नागरिकांसाठी आरोग्य तपासणी, बी.एम.आय. तपासणी तसेच आहार, शरीराचे वजन नियंत्रण व आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिरात आरोग्य सल्लागार म्हणून पोलमी कुलकर्णी, अमोल कुलकर्णी आणि प्रियांका शेंगाळे यांनी उपस्थित नागरिकांना आरोग्यविषयक महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. बदलती जीवनशैली, संतुलित आहाराचे महत्त्व, नियमित व्यायाम व आजारांचे प्रतिबंध याबाबत तज्ज्ञांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी गटनेता महेंद्र गुजर, नगरसेवक रविंद्र चाळके, नगरसेवक प्रशांत कडू, आरबाज मणेर, स्वप्नील धनावडे, प्रेषित बारटक्के, अकिब येरुणकर, यासिन पानसरे, माजी नगरसेविका समीक्षा बामणे आदी उपस्थित होते.

## प्रभाग दोनमध्ये महाविकास आघाडीची प्रचारात आघाडी- अरविंद म्हात्रे

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

१५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची चुरस वाढली असून प्रभाग क्रमांक दोन हा मागील सार्वत्रिक निवडणुकीमध्ये शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला राहिला होता. आणि आता सुद्धा या प्रभागामधून अर्चना भोईर, योगिता फडके, अरविंद म्हात्रे, राम पाटील हे महाविकास आघाडीचे चारी उमेदवार शिट्टी चिन्ह घेऊन निवडणुकीला सामोरे जात आहेत. येथील नागरिकांचा प्रतिसाद पाहता या प्रभाग क्रमांक दोन मध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयाची खात्री झाली असल्याची माहिती शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार अरविंद म्हात्रे यांनी सांगितले.

प्रभाग दोनमध्ये नावडे, पडघा, तोंडऱ्याचा पाढा देवीचा पाढा आदी भाग येतात. या सर्व गावांमध्ये पूर्वीपासूनच शेतकरी कामगार पक्षाचे वर्चस्व राहिले आहे. या प्रभागांमध्ये कोकण शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांचे नावडे गाव या प्रभागात येत असल्यामुळे या प्रभागाकडे विरोधी पक्षाचं सुद्धा खूप बारीक लक्ष राहिले आहे. ज्या भागामध्ये बाळाराम पाटील, काशिनाथ पाटील, नारायण घरत, बबन पाटील, सुदाम पाटील या सर्वांनी आपले दौरे केले. मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहिल्यानंतर महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून येतील असा विश्वास आघाडीच्या नेत्यांना आला आहे.

### संक्रांतीच्या सुगडांचे उत्पादन घटले | मजुरी, मातीचे दर खिशाला न परवडणारे

## कुंभार समाजाच्या व्यवसायाला उतरती कळा

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन येथे पारंपारिक कुंभार व्यवसायाला उतरती कळा लागली असून विविध समस्यांनी कुंभार समाजाचा व्यवसाय हा संकटात सापडला आहे. कुंभार समाजाचा पारंपरिक व्यवसाय हा तांबड्या मातीचा वापर करून संक्रांतीसाठी सुगडं, विविध कार्यांसाठी मडकी, झाडांसाठी कुंड्या, दिवाळीकरीता पणत्या, पाण्याचे माठ व शेगडी तयार करणे हा असून श्रीवर्धन येथील कुंभार वाड्यातील दहा ते बारा कुटुंबांचा उदरनिर्वाह याच व्यवसायावर अवलंबून आहे.



डोंगरावरून तांबडी माती आणीत ती माती चाळून त्यातील खडे वेगळे केले जातात आणि त्यानंतर माती पाण्यात भिजवून एकजीव केली जाते. भिजवलेली माती हाताने मळून एकजीव करण्यात येते, जेणेकरून मातीला योग्य आकार देता येतो, तयार केलेला मातीचा गोळा फिरत्या चाकाच्या मध्यभागी ठेवीत हातांच्या आणि बोटांच्या सहाय्याने फिरत्या चाकावर मातीला योग्य आकार दिला जातो. आकार दिलेले हे ओले सुगड चाकावरून वेगळे करीत सुकण्यासाठी ठेवले जाते.सुकलेल सुगड पक्के करण्यासाठी भट्टीत भाजण्यात येतात.

श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीतील तांबडीचा डोंगर असून डोंगरातील काही अंशी भाग हा कुंभार व्यावसायिकांसाठी राखीव आहे. येथील तांबडी माती ही ज्या व्यवसायिकांकडे कुंभार जातीचा दाखला आहे, त्या व्यवसायिकाला नगरपरिषदेकडून माती अल्पदरात देण्यात येते. तांबडीचा डोंगर परिसरात वाढती वस्ती या अनुषंगाने माती आणण्यासाठी व्यावसायिकाला मालवाहक वाहन नेणे अशक्य होऊ लागले. मनुष्यबळाची कमतरता या कारणास्तव हाती तांबडी माती आणणे हे व्यवसायाकरीता अपुरे पडत आहे.

तांबड्या मातीची समस्या, घरातील तरुणांनी नोकरी निमित्त शहराची धरलेली वाट त्यामुळे अपुरे मनुष्यबळ त्यातच मजुर घेतले तर अवास्तव मजुरी, श्रीवर्धन तालुक्यात दिवसेंदिवस कमालीची घट होत चाललेली भातशेती त्यामुळे भात तुसाची कमतरता यामुळे तुसाचे वाढते भाव त्यातच अवकाळी पाऊस या अनेक कारणांमुळे व्यवसायास उतरती कळा लागली आहे.

## गरजू विद्यार्थ्यांना ब्लँकेटचे वाटप

**खरोशी :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या नाना टिळक प्राथमिक विद्यालय वावोशी येथील गरीब गरजू विद्यार्थ्यांना विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून प्रभुदास घरत व धनाजी घरत यांच्या सौजन्याने ब्लँकेटचे मोफत वाटप करण्यात आले. विश्व हिंदू परिषदेच्या वतीने आशाये चॅरिटेबल ट्रस्ट, नाकोडा भैरव मंडळ लालबाग, वर्धमान संस्कृती सेवाधाम आणि कोलबा रोटरी बँक यांच्या सहकार्याने प्रभुदास घरत व धनाजी घरत यांच्या सौजन्याने विद्यार्थ्यांना मोफत ब्लँकेटचे वाटप करण्यात आले यावेळी शाळेचे मुख्याध्यापिका विद्या घरत, सहशिक्षिका मानसी केदारे, रिया वालम, सुनील पवार यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## निवडक

### रमाकांत म्हात्रे यांचे निधन



**पेण :** पेण तालुक्यातील पाटणोली गावाचे माजी सरपंच रमाकांत ऊर्फ देव दामोदर म्हात्रे यांचा अल्पशा आजाराने वयाच्या ७७ व्या वर्षी निधन झाले. त्यांनी सलग १० वर्ष पाटणोली ग्रामपंचायतीचे बिनविरोध सरपंच म्हणून काम पाहिले. तसेच १० वर्ष गाव पंच म्हणून देखील त्यांनी काम पाहिले. त्यांच्या कारकीर्दीमध्ये पाटणोली गावच्या ब्रिटीश कालीन पुलाची रुंदी वाढवून, श्री. क्षेत्र पाटणेश्वर येथे बस, ट्रक, मोठी चारचाकी वाहने जाण्यासाठी सोय केली. तसेच अनेक विकासाची कामे करुन गावाला एक वेगळीच दिशा दिली. एकेकाळी त्यांनी गावामध्ये समर्थपणे माजी आमदार मोहन पाटील यांची बाजू भक्कमपणे मांडून शेकापक्षाची धुरा सांभाळली. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी एक मुलगा, तीन मुली, नातवंडे असा परिवार असून, शेवटपर्यंत गावाच्या भल्याचा विचार त्यांनी केला. त्यांच्यावर अंत्यसंस्कार पाटणेश्वर येथील स्मशानभूमीत झाला. त्यावेळी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात अनेकजण उपस्थित होते.

### दवे यांची मोरे कॉलेजला भेट



**खांब :** मुला-मुलींच्या शिक्षणाची ओढ कायम राहावी आणि पैशाअभावी कोणाचेही शिक्षण थांबू नये, या उद्देशाने सुदर्शन कंपनीच्या सी.एस.आर. फाउंडेशनतर्फे सुधा सितारा शिष्यवृत्ती प्रकल्प राबवला जातो. याच प्रकल्पाशी मागील अनेक वर्षांपासून दुबईतून मनापासून जोडल्या गेलेल्या प्रिया दवे आणि धावणी दवे यांनी नुकतीच एम. बी. मोरे कॉलेजला सदिच्छा भेट देऊन विद्यार्थी वर्गाशी सुसंवाद साधला. या भेटीदरम्यान एम.बी.मोरे कॉलेजच्या प्राचार्यांनी प्रिया दवे आणि धावणी दवे यांचे लेझीमद्वारे विद्यार्थ्यांकडून उत्साहात स्वागत केले. प्रिया दवे आणि धावणी दवे या प्रकल्पासाठी सातत्याने सहकार्य करत असतात. तिथल्या अनेकांना या प्रकल्पाशी जोडण्यासाठी प्रोत्साहित करतात. महाविद्यालयात येऊन त्यांनी ही शिष्यवृत्ती खऱ्या अर्थाने गरजू आणि हुशार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत असल्याचे पाहिले, तेव्हा त्यांनी मनापासून आनंद व्यक्त केला.

### भुवन आदिवासीवाडीत आरोग्य तपासणी



**माणगाव :** भुवन आदिवासीवाडी व वडाचीवाडी परिसरात आरोग्य विभागाच्या वतीने ताप व रक्त नमुना तपासणी करण्यात आली. या वेळी एकूण ३ जणांचे ताप व रक्त नमुने घेण्यात आले.याच अनुषंगाने वरदायिनी विद्यालय, महागाव येथील हायस्कूल विभागातील विद्यार्थ्यांना हिवताप, परिसर स्वच्छता तसेच वैयक्तिक स्वच्छता या विषयांवर आरोग्य शिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांना आजाराची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, स्वच्छतेचे महत्त्व आणि आरोग्यदायी सवयी याबाबत आरोग्यसेवक सुधीर खैरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास वरदायिनी विद्यालयाचे मुख्याध्यापक व्यवहारे, हेमंत बारटक्के, माळी, कजबजे तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनात हा उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली असून स्वच्छतेच्या सवयी अंगीकारण्याचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. उपस्थित सर्वांनी या उपक्रमाचे स्वागत करून आयोजकांचे अभिनंदन केले.

### लता ढेबे यांच्याकडून शौचालयांची पाहणी

**माथेरान :** पर्यटननगरी माथेरानमधील मुख्य पॉईंट्सवरील शौचालयांची दयनीय अवस्था झाल्याने याचा वापर करणे अशक्यप्राय बाब बनली आहे. त्यामुळे विशेष करून महिला पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून वेळप्रसंगी जंगलाचा आधार घ्यावा लागत आहे. प्रभाग क्र. २ च्या कार्यक्षम नगरसेविका लता ढेबे यांनी या स्थळाची पाहणी करून एको पॉईंट त्याचप्रमाणे अन्य महत्वाच्या पॉईंट्सवर अद्ययावत शौचालय उभारण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करून लवकरात लवकर ही समस्या मार्गी लावण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले जातील असे आश्वासन दिले आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते राकेश कोकळे यांनी याकामी नगरपालिका प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार केला होता. परंतु याबाबत कुणीही जबाबदारी घेत नव्हते. त्यामुळे राकेश कोकळे यांनी समाजमाध्यमांवर सदर शौचालयांच्या दुरवस्थेबाबतीत फोटो व्हायरल करून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबाग कोकोनट रिसॉर्टसाठी वेटर व हाऊसकीपिंग कामासाठी मुलांची गरज आहे. इच्छुकांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.+९१९९७००४१५७९ पत्ता: अलिबाग कोकोनट रिसॉर्ट, हॉटेल शालीमारच्या समोर, अलिबाग, रायगड.
- For office in Alibag Vacancy for office staff Attractive salary For interview call 9923750549
- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- विकणे आहे : अलिबाग-कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- किहीम-चोंढी येथील हॉटेलमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत. Cook-Waiter-Helper-etc. 9152990991 Email: csskshirishkar@gmail.com
- नागाव येथे रिसॉर्ट मध्ये कामासाठी मुलगा व जोडपे पाहिजे आहे तरी संपर्क साधावा. मोबाईल नंबर.९३७१७१४५५२/९३७१७१४५५६
- होमस्टे भाड्याने द्यायचे आहे. पत्ता : विजयनगर-वरसोली-नांदे होमगार्ड ऑफिस शेजारी. मो. ७५०७९२९१२८/९४२२४९४५९०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# नावंढे परिसराचा पाणीपुरवठा खंडित



| खोपोली | प्रतिनिधी |

नावंढे ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांनी गोदरेज वूड कंपनी विरोधात संताप व्यक्त केला आहे. कंपनी व्यवस्थापनाच्या मनमानी कारभारामुळे दोन दिवसापासून ग्रामपंचायतीतील गावांचा पाणीपुरवठा खंडित झाला आहे.

कंपनी व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे विद्युत पुरवठा खंडित झाल्याचे समजताच ग्रामस्थांनी गोदरेज कंपनीच्या आवारात ज्याठिकाणी विद्युत पुरवठा करणारी लाईन कट झाली, त्याठिकाणी जात कंपनी व्यवस्थापनाला व महावितरण प्रशासनाला धारेवर धरत त्वरित विद्युत पुरवठा सुरळीत करून पाणीपुरवठा पूर्ववत व्हावा यासाठी मागणी केली. मात्र गोदरेज कंपनीच्या मनमानी कारभारामुळे दोन दिवस पाणी न आल्याने सर्वत्र ठिकाणी संताप व्यक्त केला जात आहे.

नावंढे गावाजवळ गोदरेज वूड कंपनीचे नव्याने काम सुरू होताच या ठिकाणी स्थानिकांना रोजगार मिळावा म्हणून अनेक वेळा ग्रामस्थांनी आंदोलन करत रोजगार मिळावे यासाठी प्रयत्न केले असता यावेळी गोदरेज कंपनी प्रशासन व स्थानिकांमध्ये संघर्ष ही पाहायला मिळाला. त्यामुळे येथील बहुसंख्य ग्रामस्थ गोदरेज कंपनीच्या प्रशासना विरोधात नाराजी व्यक्त करत असताना पुन्हा एकदा येथील ग्रामस्थ कंपनीच्या कारभाराबाबत संताप व्यक्त करीत आहेत. कंपनीच्या हलगर्जीपणामुळे गावात दोन दिवस पाणीपुरवठा न झाल्याने ग्रामस्थ १० जानेवारी रात्री ७ वाजण्याच्या सुमारास आक्रमक झाले होते.

गोदरेज वूड कंपनीच्या आवारात मोठ्या प्रमाणात जेसीबी पोकलेन सहायाने सपाटीकरण करत जागेची लेव्हलिंग करण्यात येत आहे. कंपनीच्या कामात विद्युतपुरवठा करणारे पोल्स व्यत्यय आणत असल्याने कंपनी प्रशासनाने महावितरण प्रशासनाला हाताशी धरत ग्रामपंचायत प्रशासन व ग्रामस्थांना विश्वासात न घेता जवळपास दीड ते दोन किलोमीटर अंतराचे एचटी लाईनचे पोल्स काढून टाकत अंडरग्राउंड लाईन टाकली आहे. ही अंडरग्राउंड लाईन जेसीबीच्या सहायाने काम करत असता कट झाल्याने गेल्या दोन दिवसा-पासून घोडीवली गाव, नावंढे, शिवगाव या गावांचा पाणीपुरवठा खंडित झाल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. जेसीबीच्या सहायाने काम करत असताना अंडरग्राउंड लाईन गोदरेज कंपनीच्या आवारात कट झाल्याचे ग्रामस्थांना समजतात ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेत महावितरण प्रशासन व कंपनी प्रशासनाला जाब विचारला. महावितरणने ग्रामस्थ व ग्रामपंचायत प्रशासनाला विश्वासात न घेता गावाचा पाणीपुरवठा व विद्युतपुरवठा करणारे पोल्स कंपनीच्या हितासाठी का काढून टाकले असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

> नावंढे गावचे हद्दीमध्ये गोदरेज कंपनीचा रेसिडेनशियल प्रोजेक्ट डेव्हलप करत आहे. सदर ठिकाणी महावितरण कंपनीची ओव्हर् हेड एचटी लाईन अडथळा येत असल्यामुळे सदरची लाईन महावितरणच्या नियमानुसार गोदरेज कंपनीने अंडरग्राउंड करण्याचे काम सुरु आहे.
> – प्रवीण शेटगे, सहायक अभियंता,खालापूर शाखा


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

| उरण | प्रतिनिधी |

यु. ई. एस. स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजी मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन साजरे करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी महाधिवक्ता महाराष्ट्र, ॲड. आशुतोष कुंभकोनी उपस्थित होते. त्यांचा सत्कार यु.ई. एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर यांच्या करण्यात आला. उरण नगरपालिकेच्या नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर उपस्थित होत्या. त्यांचा यु.ई.एस. संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, ॲड. राजेंद्र भानुशाली, ॲड. अपूर्वा ठाकूर, तनसुख जैन यांचा सन्मान करण्यात आला.

## ‘ गावागावात हिंदू जनजागृती काळाची गरज ’

| रसायनी | प्रतिनिधी |

अखिल आर्यवत संघ,राष्ट्रीय बजरंग दलातर्फे आयोजित विराट हिंदू एकता संमेलन पोद्दार समृद्धी क्लब हाऊसमध्ये आंतरराष्ट्रीय बजरंग दल संस्थापक अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या नेतृत्वात शनिवारी सायं उशिरा पार पडले.यावेळी आंतराष्ट्रीय बजरंग दल रसायनी खालापूर , रायगड जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी हनुमान चालीसा मंत्र जप, सुंदरकांड, महाआरती, श्री राम नाम भजन तर विद्या-र्थी वर्गातील लहान मुलांनसाठी प्रश्नोत्तरे असे विशेष नियोजन बद्द कार्यक्रम साकारण्यात आले होते. त्यांना सन्मानपत्र व पारितोषिक देवून कार्यक्रम पार पडला. विद्यार्थी प्रश्नोत्तरे मध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक आलेल्या व सहभागी विद्यार्थी यांना दिनेश पाटील याच्यांहस्ते प्रमाण पत्र देऊन त्याचा सन्मान करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावरून दिनेश पाटील बोलत होते की, या देशातील हिंदू जागृत होत आहे, हिंदूना जागृत करण्यासाठी राष्ट्रीय बजरंग दल गाव वाड्या,वस्त्यानवर बजरंग दलाचे कार्यकर्ते नागरिकांत जाऊन जन जागृत करत आहेत. बदलापूर येथे हा ठेवण्यात आलेला कार्यक्रम देखावा किवा शोभेसाठी ठेवलेला नसून तो हिंदू बांधवाना एकत्रित आणन्यासाठी असून हि तर एक चिंगारी आहे, असे कार्यक्रम गावागावात होणे आज काळाची गरज बनलेली आहे, असे कार्यक्रम ठेवण्यासाठी पैसेच पाहिजे असे काही नाही, सर्व हिंदू यांनी एकत्रित आल्यास उत्तम प्रकारे जनजागृती होऊन अतिशय सुलभ होणारी आहे.

हिंदूनी अयोध्येत बाबरी मस्जिद तोडली, त्यावेळेस हिन्दू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी स्वतः ठाम भूमिका घेतली कि ती बाबरी मस्जिद आम्ही हिंदूनी तोडली आहे असे देशातील एकमेव सांगणारे व जबाबदारी स्वीकारणारे बाळासाहेब ठाकरे होते, असे उपस्थित जनसमुदायास प्रबोधन करत असताना अंतरराष्ट्रीय बजरंग दल संस्थापक अध्यक्ष दिनेश पाटील बोलत होते.

यावेळी कोकण प्रांत मंत्री सचिन धुळे, विशाल जैस्वाल, रायगड जिल्हा अध्यक्ष बाबू भोईर, मावळ लोकसभा अध्यक्ष राकेश खराडे, जनार्दन मालूसरे, ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष राकेश टेंबे, चेतन जामगरे, संपर्क प्रमुख महेंद्र, मलेश गुडसे, प्रशांत तांबोळी, प्रदीप गुप्ता, दुर्गाशक्ती पोद्दार, जैस्वाल ठक्कर आदी उपस्थित होते.

## बेकायदेशीर परदेशी वास्तव्यावर धडक

| पनवेल | प्रतिनिधी |

नवी मुंबईत बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांविरोधात पोलिसांनी कारवाईचा वेग वाढवला असून, त्यांना आश्रय देणाऱ्या खोलीमालकांवर थेट गुन्हे दाखल करण्याची भूमिका घेतली आहे. शुक्रवारी एकाच दिवशी तळोजा आणि खारघर या दोन वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत परदेशी नागरिकांची माहिती लपविल्याप्रकरणी खोलीमालकांविरोधात गुन्हे नोंदवण्यात आले. या कारवाईमुळे बेकायदेशीर वास्तव्य करणारे परदेशी नागरिक तसेच त्यांना आश्रय देणाऱ्या मालकांचे धाबे दणाणले आहेत.

परदेशी नागरिक कायदा १९४६ मधील कलम १४ (क) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सेक्टर १० मधील पार्वती हाइट्स या इमारतीत शुक्रवारी सकाळी सात वाजता करण्यात आलेल्या तपासणीत ही बाब उघडकीस आली. इमारतीतील खोली क्रमांक ५०१ मध्ये ३५ आणि ४२ वर्षांचे दोन परदेशी नागरिक वास्तव्यास असल्याचे आढळले. या नागरिकांना भाडेकरू म्हणून ठेवताना खोलीमालकाने केंद्र सरकारच्या परदेशी नागरिकांसाठी असलेल्या संकेतस्थळावर सी-फॉर्मद्वारे नोंदणी न केल्याचे तपासात स्पष्ट झाले. त्यामुळे खोलीम ालकाने बेकायदेशीर आश्रय देण्यास मदत केल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याच दिवशी खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीतही अशीच कारवाई करण्यात आली. सेक्टर ३५ एफमधील ड्रीम सफायर इम ारतीतील दोन सदनिका परदेशी नागरिकांना भाड्याने देण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. चौकशीअंती या सदनिकांमध्ये चार परदेशी नागरिक राहत असल्याचे निष्पन्न झाले. मात्र संबंधित खोलीम ालकांनी त्याबाबतची माहिती पोलिसांना किंवा अधिकृत यंत्रणांना दिली नसल्याचे समोर आले.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील सुरक्षेच्या दृष्टीने नवी मुंबई पोलिसांनी अशा प्रकारच्या तपासण्या अधिक तीव्र केल्या असून, बेकायदेशीर परदेशी वास्तव्य आणि त्यांना मदत करणाऱ्यांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

## सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

**खरोशी** : रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वढाव शाळेत २५ वर्षांनी संस्कृतिक कार्यक्रम साजरा केला. एकीकडे शाळा बंद होत असताना गावातील तरुण मुलांनी एकत्र येऊन या शाळेला नवसंजीवनी दिली आणि शाळेची पटसंख्या वाढवून,नवीन इमारत भूमिपूजन करण्यात आले. या कार्यक्रम ने रसिकांची मने जिंकली, चिमुकल्यांचे नृत्य गायन कला याने कार्यक्रमाची रंगत वाढविली. या कार्यक्रमासाठी प्रभाकर म्हात्रे, समीर म्हात्रे, चेअरमन चंद्रहास म्हात्रे, बी. जी. ठाकूर विद्यालय, सी.आर. म्हात्रे, अजित ठाकूर, वसंत रघुनाथ म्हात्रे, सुरेश म्हात्रे, रवींद्र म्हात्रे, मारुती म्हात्रे, चंद्रकांत म्हात्रे, रमेश म्हात्रे, किशोर म्हात्रे आदी उपस्थित होते.

### अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा उपक्रम | जनतेला पुस्तके देण्यावर भर

## संक्रांतीला ज्ञानाचे वाण देण्याचा नवा पायंडा

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

मकर संक्रांत अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. संक्रांतीच्या हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमात महिलांना मवाणफ म्हणून काय द्यावे, असा प्रश्न नेहमीच पडतो. मात्र, यावर्षी पारंपारिक प्लास्टिकच्या वस्तू टाळून ज्ञानाचे आणि विज्ञ-ानाचे वाण देण्याचा नवा पायंडा पडत आहे. नवे संक्रमण, नव्या विचारांचे या उक्तीनुसार यंदा पुस्तके आणि पर्यावरणपूरक वस्तूंची भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हळदी-कुंकवाचे वाण हे केवळ एक औपचारिकता नसून ते उपयुक्त आणि कल्पक असावे. त्यामुळे दैनंदिन सवयी बदलून आणि प्लास्टिकचा त्याग करून खऱ्या अर्थाने निसर्गाचे संवर्धन करू शकतो. तसेच वाण म्हणून पुस्तके दिल्यास वाचन प्रेरणा व वाचन संस्कृती वाढू शकते. हळदी कुंकवासारख्या कार्यक्रमात अशाप्रकारे विधायक उपक्रम राबवून प्रबोधनात्मक संदेश कृतीतून देण्यात येणार आहे.

समाजातील अंधश्रद्धा दूर व्हाव्यात आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा, या हेतूने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या व्याख्यानांवर आधारित २५ छोट्या पुस्तिकांचा संच वाण म्हणून उपलब्ध करून देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, महिलांसाठी या पुस्तिका ५०% सवलतीच्या दरात म्हणजेच केवळ २० रुपयांत १ पुस्तक या दराने उपलब्ध आहेत.

केवळ वस्तूंची देवाण-घेवाण न करता पर्यावरणाचे रक्षण व्हावे, यासाठी निवेदिता प्रतिष्ठानने तसेच इतरही संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी काही महत्त्वाचे नियम पाळण्याचे आवाहन केले आहे. वाण म्हणून प्लास्टिकच्या वस्तू न देता धान्य, कापडी पिशव्या किंवा तुळस, ओवा, वेखंड यांसारखी आयुर्वेदिक रोपे भेट द्यावीत. चहा-नाश्त्यासाठी मयुज अँड थ्रोफ कप किंवा पेपर डिशऐवजी स्टील, काच किंवा चिनीमातीच्या भांड्यांचा वापर करावा. तिळगुळ घेण्यासाठी महिलांनी स्वतःसोबत छोटा स्टीलचा डबा ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

> महिलांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे ही काळाची गरज आहे. एका स्त्रीमुळे संपूर्ण कुटुंब अंधश्रद्धा मुक्त होऊन वैज्ञानिक दृष्टीकोन अंगीकारू शकते. संक्रांतीचे वाण देताना ते केवळ कपाटात पडून राहणारी वस्तू नसावी, तर ती विचारांना प्रगल्भ करणारी असावी. डॉ. दाभोलकरांच्या पुस्तिकांच्या माध्यमातून आम्ही वैज्ञानिक दृष्टिकोनाचे वाण घराघरांत पोहोचवत आहोत. महिलांनी या उपक्रमात सहभागी होऊन अंधश्रद्धा निर्मूलनासाठी आणि वाचन संस्कृती जोपासण्यासाठी पुढाकार घ्यावा.
> - संदेश गायकवाड, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, रायगड


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. मुग्धा निलेश देसाई यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे आर प्रति | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| २५ | १/अ/१ | ०.६०.०० | ०.४४ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, कुळ वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि.रायगड मो.नं. ७७९८४३३८८८

सही/-
**ॲड. कैलास अनंत बासरे**

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे मुळे, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक अर्जुन धोंडू पाटील वगैरे ४ रा. मुळे, पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेल्या मालकी हक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मुळे ता. अलिबाग | ११७ | ०-२५-०० | ३.०० |
| | | पो.ख. ०-०५-१० | |
| | | एकूण ०-३०-१० | |

सबब सदरहू जागा, जमिन व मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे. असे गृहीत धरुन आमचे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या स्नेहींवर बंधनकारक राहणार नाहीत.

दिनांक : १२/०१/२०२६

सही/-
**शेखर विष्णू मगर**
पत्ता: दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या निवासी सदनिकेचे विद्यमान मालक श्री. पांडुरंग गोविंद ठाकूर, रा. पानसे वाडी, गणेश टॉकीजच्या मागे, पो. चौल, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेला निवासी सदनिका माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे स्नेही यांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या स्नेही यांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील स.नं. ७७, हि.नं. २, प्लॉट नं.३ या जमिनीवरील बांधलेल्या ओमकार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., नागडोंगरी, चेंढरे या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. १० (ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. ७५६/१०) क्षेत्र ६३६ चौ. फुट एवढ्या क्षेत्रफळाची निवासी सदनिका .

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे. असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या स्नेहींवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०१/२०२६

सही/-
**श्री. शेखर विष्णू मगर**
पत्ता : रा. दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो.. माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र. ३४/२०२५

१. मुखतार हसन परदेशी,
रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड ... अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
निजामपूर, ग्रामपंचायत निजामपूर,
ता. माणगाव, जि. रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव ...सामनेवाले
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव क्र. २२, दि. ०२/०१/२०२६ दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी मुखतार हसन परदेशी, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०३/०५/१९६२ रोजी निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

मुखतार हसन परदेशी, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०३/०५/१९६२ रोजी निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला आहे. तरी मुखतार हसन परदेशी, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०३/०५/१९६२ रोजी निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच श्री. मुखतार हसन परदेशी यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत निजामपूर यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मुखतार हसन परदेशी, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०३/०५/१९६२ रोजी निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : ०६/०१/२०२६

सही/-
**(विपीन लोकरे)**
कार्यकारी दंडाधिकारी,
माणगाव. जि. रायगड

### जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो.. माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र. ३५/२०२५

१. मोईनुद्दीन हसन परदेशी,
रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड ... अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
निजामपूर, ग्रामपंचायत निजामपूर,
ता. माणगाव, जि. रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव ...सामनेवाले
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव क्र. २३, दि. ०२/०१/२०२६ दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी मोईनुद्दीन हसन परदेशी, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. २२/०१/१९७३ रोजी निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

मोईनुद्दीन हसन परदेशी, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. २२/०१/१९७३ रोजी निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला आहे. तरी मोईनुद्दीन हसन परदेशी, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. २२/०१/१९७३ रोजी निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच श्री. मोईनुद्दीन हसन परदेशी यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत निजामपूर यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मोईनुद्दीन हसन परदेशी, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. २२/०१/१९७३ रोजी निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : ०६/०१/२०२६

सही/-
**(विपीन लोकरे)**
कार्यकारी दंडाधिकारी,
माणगाव. जि. रायगड

### जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक गोविंद शंकर मिणमिणे यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे अंजप, ता. कर्जत. जि. रायगड | ८०/२/अ | ०.२०.०० | ०.१५ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक: १२/१/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

### जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक विक्रांत विरेंद्रकुमार अग्रवाल व कैवल्या विरेंद्रकुमार अग्रवाल यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे वैजनाथ, ता. कर्जत. जि. रायगड | १३/६ | ०.०८.०० | ०.१६ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विकी, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व ईतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक: १२/१/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

# मुंबई इंडियन्सचे जबरदस्त पुनरागमन

## दिल्ली कॅपिटल्सचा दारूण पराभव; पहिल्या विजयासह गुणतालिकेत अव्वल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई इंडियन्सने महिला प्रीमिअर लीग २०२६ मध्ये पहिला विजय मिळवला आहे. गतविजेत्यांना सलामीच्या लढतीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने शुक्रवारी (दि.९) झालेल्या रोमहर्षक लढतीत पराभूत केले होते. मात्र, शनिवारी (दि.११) मुंबई इंडियन्स वेगळ्याच फॉर्मात दिसली. त्यांनी सर्व आघाड्यांवर दमदार कामगिरी करताना दिल्ली कॅपिटल्सवर दणदणीत विजयाची नोंद केली. या विजयासह, मुंबई इंडियन्सने गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचण्यातही यश मिळवले आहे.



पहिल्या सामन्यात झालेल्या पराभवातून मुंबईने धडा घेत डब्ल्यूपीएलच्या दुसऱ्या लढतीत दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध धावांचा डोंगर उभा केला होता. एमेलिया केर (०) व गुनालन कमालिनी (१६) या सलामीच्या जोडीला यावेळी अपयश आले. परंतु, नॅट शिव्हर ब्रंट आणि कर्णधार हरमनप्रीत कौर यांच्या दमदार फटकेबाजीने दिल्लीला बेजार केले. शिव्हर ब्रंटने सुरुवातीला कमालिनीसोबत अर्धशतकीय भागीदारी करून संघाला सावरले. त्यानंतर हरमनप्रीतसोबत धावांचा वेग वाढवला. यावेळी शिव्हर ब्रंटने ४६ चेंडूंत १३ चौकारांसह ७० धावांची खेळी केली, त्यानंतर हरमनप्रीतने मोर्चा सांभाळला. तिने ४२ चेंडूंत ८ चौकार व ३ षटकारांसह नाबाद ७४ धावांची खळी केली. निकोला केरीनेही १२ चेंडूंत २१ धावा करून मुंबईला ४ बाद १९५ धावांपर्यंत पोहोचवले.

त्यानंतर फलंदाजीत कमाल दाखवणाऱ्या मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनीही डाव टाकला. निकोला केरीने २ षटकांत १४ धावा देताना ३ बळी घेताना दिल्लीची अवस्थआ ५ बाद ४६ अशी दयनीय केली. लिझली ली (१०) हिला नॅटने बाद केले आणि कर्णधार जेमिमा रॉड्रीग्जला (१) इस्मैलने माघारी पाठवले. येथून दिल्लीला विजय मिळवणे अवघड होते. निकी प्रसाद व चिनेली हेन्री यांनी चांगली फटकेबाजी केली. परंतु, एमिलिया केरने दिल्लीला सहावा धक्का देताना प्रसादला १२ धावांवर बाद केले. हेन्रीने षटकार खेचून अर्धशतक पूर्ण केले; परंतु, धावा आणि चेंडू यातले अंतर एवढे होते की तिला संघाला विजय मिळवून देता आला नाही. हेन्री ३३ चेंडूंत ५ चौकार व ३ षटकारांसह ५६ धावांवर झेलबाद झाली. १२ चेंडूंत ६० धावा दिल्लीला हव्या होत्या आणि हातात एकच गडी शिल्लक राहिली होता. संस्कृतीने दिल्लीचा शेवटचा बळी घेऊन त्यांना १४५ धावांवर सर्वबाद केले आणि मुंबईने ५० धावांनी हा सामना जिंकला.

हंगामातील पहिल्या सामन्यात पराभव पत्करणाऱ्या गतविजेत्या मुंबई इंडियन्सने दुसऱ्या सामन्यात उल्लेखनीय पुनरागमन केले. या विजयासह, मुंबई इंडियन्सने गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचण्यातही यश मिळवले.

पहिल्या सामन्यात रोमांचक विजय मिळवणारा आरसीबी सध्या तिसऱ्या स्थानावर आहे. २०२६ मधील तीन सामन्यांनंतर, मुंबई इंडियन्स गुणतालिकेच्या आघाडीवर आहे. संघाने आतापर्यंत दोन सामने खेळले असेन एक जिंकला आहे आणि एक गमावला आहे. मुंबई इंडियन्सचा नेट रन रेट १.१७५ आहे. पहिला सामना १० धावांनी जिंकणारा गुजरात जायंट्स दुसऱ्या स्थानावर आहे. गुजरात जायंट्सचे एका सामन्यानंतर २ गुण आहेत आणि नेट रन रेट ०.५०० आहे. पहिल्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा तीन गडी राखून पराभव करणारा आरसीबी महिला संघ दोन गुणांसह आणि ०.१५० च्या नेट रन रेटसह तिसऱ्या स्थानावर आहे.



## गुजरातचा दणदणीत विजय

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गुजरात जायंट्सने डब्ल्यूपीएलच्या चौथ्या पर्वातील सर्वाधिका धावांचा डोंगर उभा केला. त्यांनी २०७ धावा करून इतिहासातील संघाच्या सर्वोत्तम धावांची नोंद केली. लक्ष्याचा पाठलाग करताना युपी वॉरियर्सकडून संघर्ष पाहायला मिळाला; परंतु, गुजरातने बाजी मारली.

गुजरातने प्रथम फलंदाजी करताना ४ बाद २०७ धावांचा डोंगर उभा केला. यावेळी सोफी डिव्हाईन (३८), अनुष्का शर्मा (४४) व कर्णधार ॲश गार्डनर (६५) यांच्या खेळीने मोठी धावसंख्या उभारली. अनुष्का व गार्डनर यांनी तिसऱ्या बळीसाठी १०३ धावांची भागीदारी केली. तर, जॉर्जिया वारेहॅमने २७ आणि भारती फुलमलीने १४ धावांची नाबाद खेळी करून संघाला दोनशेपार पोहोचवले. लक्ष्याचा पाठलाग करताना युपीची सलामीवीर किरण नवगिरे १ धाव करून बाद झाली. कर्णधार मेग लॅनिंग व फोएब लिचफिल्ड यांनी दुसऱ्या बळीसाठी ७० धावा जोडून युपीला विजयाच्या दिशेने कूच करून दिले. परंतु, लॅनिंग ३० धावांवर बादी झाली. त्यानंतर लगेचच हर्लीन देओल (०) देखील बाद झाली. दीप्ती शर्मा १ धाव काढून बाद झाली. त्यानंतर लिचफिल्ड हिने २४ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. परंतु, ती देखील ७८ धावांवर बाद झाली. त्यांनतर श्वेता सेहरावतने २५, डिएंड्रा डॉटीनने १२ धावा केल्या. मात्र, सोफी (११) झेलबाद झाली आणि युपीच्या विजयाच्या आशा संपुष्टात आल्या. गुजरातने हा सामना १० धावांनी जिंकला.

# निवडक

## पालीतील अनुज सरनाईकला रौप्य

**पाली-बेणसे :** दिव घोगला बीच येथे दि.५ ते १० जानेवारी या कालावधीत सुरू झालेल्या खेलो इंडिया बीच गेम स्पर्धेमध्ये पिंच्याक सिल्याट या क्रीडा प्रकारामध्ये रेगू इवेंटमध्ये महाराष्ट्राच्या



पाली येथील अनुज सरनाईक, अंशुल कांबळे आणि मुकेश चौधरी या पुरुष संघाने रौप्यपदक पटकावले आहे. या खेळाडूंना स्पोर्ट ऑफ इंडियाच्या डेपोडी डायरेक्टर भावीनी यांच्या हस्ते पदक प्रदान करण्यात आले. तसेच, महाराष्ट्र राज्य क्रिडा युवा सेवा संचालनालयचे उप संचालक नवनाथ फडतरे, इंडियन पिच्याक फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले, इंडियन पिच्याक सिलॅट फेडरेशनचे सीईओ मोहम्मद इक्बाल व क्रीडा अधिकारी महाराष्ट्र संघ व्यवस्थापक नेहा साप्ते यांनी सर्व वजेता खेळाडूंचे अभिनंदन केले.



## गणेश गोवे संघ अंतिम विजेता

**कोलाड :** रोहा तालुक्यातील किल्ला येथे गोवे-कोलाड ग्रामीण क्रिकेट असो.च्या मान्यतेने श्री गावदेवी किल्ला येथे क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. या सामन्यात श्री गणेश गोवे संघ अंतिम विजेता ठरला. यावेळी अटीतटीच्या अंतिम सामन्यात श्री गणेश गोवे संघाने श्री सोमजाई तिसे संघावर विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तसेच, श्री सोमजाई तिसे संघ द्वितीय, तर श्री गावदेवी किल्ला संघ तृतीय क्रमांकांचा मानकरी ठरला. त्याचबरोबर गोवे संघाचा विनय दहिंबेकर मालिकावीर, तिसे संघाचा प्रजोत जाधव उत्कृष्ट फलंदाज, व किल्ला संघाचा सर्वेश जंगम उत्कृष्ट गोलंदाज म्हणून सन्मानित करण्यात आले. सर्व विजेत्या संघाना चषक व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. दरम्यान, या क्रिकेट सामन्यांचे उद्घ्याटन नरेश बामुगडे, जयवंत मुंडे, रुपेश बाळाराम बामुगडे, रुपेश मनोहर बामुगडे, जनार्दन बामुगडे, शिवाजी रहाटे, संतोष दळवी, रविंद्र रटाटे, नितीन बामुगडे, चंद्रकांत बामुगडे, तसेच गोवे-कोलाड क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र जाधव, सचिव शरद वारकर व सर्व सदस्यांच्या उपस्थित करण्यात आले.

## भारताच्या माजी हॉकीपटूचे निधन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रीडा विश्वातून एक दु:खद बातमी समोर आली आहे. भारताचे माजी हॉकीपटू दविंदर सिंह गरचा यांचे शनिवारी (दि.१०) निधन झाले. ते भारताचे ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेते राहिले आहेत. निधनासमयी ते ७३ वर्षांचे होते. त्यांनी शनिवारी जलंधरमध्ये त्याच्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला.



दविंदर सिंह गरचा हे १९८० मध्ये मॉस्को ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकलेल्या भारताच्या हॉकी संघाचा ते भाग होते. दविंदर यांचा जन्म ७ डिसेंबर १९५२ मध्ये अमृतसर येथे झाला होता. त्यांनी भारताच्या हॉकी संघासाठी १९७९ मध्ये पदार्पण केले होते. त्यानंतर १९८० ऑलिम्पिकमध्ये त्याने ६ सामन्यांत ८ गोल केले होते. त्या स्पर्धेत भारताने अंतिम सामन्यात स्पेनला पराभूत करत विक्रमी आठव्यांदा ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकले होते. त्याआधी त्यांनी कराचीत झालेल्या चॅम्पियन्स चषक स्पर्धेतही भारतासाठी सर्वाधिक गोल केले होते. परंतु, त्या स्पर्धेत भारतीय संघ पाचव्या क्रमांकावर राहिला होता. दविंदर यांनी ३० आंतरराष्ट्रीय सामने खेळले असून १९ गोल केले आहेत. त्यांना २०२१मध्ये ध्यानचंद पुरस्कारही मिळाला होता. त्यांनी हॉकी व्यतिरिक्त आयपीएस ऑफिसर आणि पंजाब पोलीस खात्यात पोलीस उपमहानिरीक्षक म्हणूनही काम केले आहे.

## मुंबईत रंगणार कॅरमचा थरार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र कॅरम संघटनेच्यावतीने तिसरी महाराष्ट्र ओपन कॅरम चॅलेंजर्स चषकाचे आयोजन दि.२९ व ३० जानेवारी रोजी मुंबईत करण्यात आले आहे. दादर (पूर्व) येथील श्री हालारी ओसवाल समाज सभागृहात ही स्पर्धा रंगणार आहे. पुरुष व महिला खेळाडूंसाठी खुल्या गटात होणाऱ्या स्पर्धेत तब्बल ८ लाख रुपयांची आकर्षक रोख पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. विजेत्यास १ लाख ५० हजार, उपविजेत्यास १ लाख, तृतीय क्रमांकास ७५ हजार तर चौथ्या क्रमांकास ५० हजार रुपये मिळणार आहेत. याशिवाय उपउपांत्य फेरीतील खेळाडूंना प्रत्येकी २५ हजार, उपउपांत्यपूर्व फेरीतील खेळाडूंना १० हजार, तर आधीच्या फेरीत पराभूत होणाऱ्या खेळाडूंना प्रत्येकी ५ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

## मॅटवर सराव करण्याचा सल्ला

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रातील कुस्तीपटू स्थानिक व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सातत्याने चमक दाखवत आहेत. मात्र, पारंपरिक मातीवरील कुस्तीकडे अधिक झुकाव असल्याने ही कामगिरी आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचण्यात मर्यादित ठरत असल्याचे स्पष्ट मत ऑलिंपिक पदकविजेता कुस्तीपटू योगेश्वर दत्त यांनी व्यक्त केले. ऑलिंपिकमध्ये पदक जिंकायचे असेल, तर मातीऐवजी मॅटवर अधिकाधिक सराव करण्याची गरज असल्याचा सल्ला त्यांनी दिला. तसेच, देशभरातील ग्रामीण भागात असंख्य गुणवंत कुस्तीपटू आहेत. तळागाळापासून नियोजनबद्ध काम झाले पाहिजे. शिक्षण आणि क्रीडा यांची सांगड घातल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. मविप्रसारख्या संस्थेचे सहकार्य



लाभल्यास भविष्यात नाशिकमध्ये कुस्ती प्रशिक्षणासाठी स्वतंत्र ॲकॅडमी सुरू करण्याचा मानस योगेश्वर दत्त यांनी व्यक्त केला. नाशिक मविप्र मॅरेथॉननिमित्ताने नाशिकमध्ये आलेल्या दत्त यांनी मविप्र मध्यवर्ती कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## हर्षिणी चव्हाणची 'सुवर्ण' कामगिरी

**। मुंबई । क्रीडा प्रतिनिधी ।**

अस्मिता खेलो इंडिया राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन उत्तर प्रदेश येथील मोदीनगर-गाझियाबाद येथे दि. ८ ते १२ जानेवारी या कालावधीत करण्यात आले होते. या स्पर्धेत १७ वर्ष वयोगटातील ४८ किलो वजनी गटात महाराष्ट्राच्या



हर्षिता चव्हाण हिने स्नॅच ६२ किलो, क्लिनजर्क ८० किलो असे एकुण १४२ किलो वजन उचलून सुवर्णपदक मिळवीले आहे. हर्षिता ही राष्ट्रीय कबड्डी खेळाडू, प्रो-कबड्डी स्टार व शिवछत्रपती मार्गदर्शक पुरस्कार प्राप्त प्रशांत चव्हाण यांची सुकन्या आहे. या स्पर्धेचे बक्षीस वितरण भारताची वेटलिफ्टर मिराबाई चानू यांच्याच्या हस्ते करण्यात आले.

## पी.व्ही. सिंधूची जोरदार सुरूवात

**क्वालालंपूर :** भारताची बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूने बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूरच्या नव्या हंगामाची जोरदार सुरुवात करत मलेशिया ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. क्वालालंपूर येथील ऑक्सियाटा अरेनात झालेल्या उपांत्यपूर्व लढतीत जपानच्या अकाने यामागुचीने दुखापतीमुळे माघार घेतल्यानंतर सिंधूला विजय मिळाला. डिसेंबर २०२४ मध्ये सय्यद मोदी इंडिया इंटरनॅशनल स्पर्धेतील विजयानंतर कोणतीही स्पर्धा न जिंकलेल्या सिंधूने या हंगामातील पहिल्याच सुपर १००० दर्जाच्या स्पर्धेत आपली लय आणि आत्मविश्वास दाखवून दिला.

## बीच स्पर्धेत महाराष्ट्राची अष्टमी



**। दीव । क्रीडा प्रतिनिधी ।**

खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राने ३ रौप्य व ५ कांस्यपदक अशी एकूण ८ पदकांची लयलटू केली आहे. साताऱ्याच्या दीक्षा यादवच्या १ रौप्य व १ कांस्यपदकामुळे सागरी जलतरणात महाराष्ट्राने उपविजेतेपद पटकावले. दीवमधील अरबी समुद्रातील सागरी जलतरणाचा महाराष्ट्राच्या मुलींनी पदकाचा करिश्मा घडविला. साताऱ्याच्या दीक्षा यादवे ५ किमी शर्यतीत रौप्य तर १० किमी शर्यतीत कांस्यपदक पटकावले. या यशामुळे सागरी जलतरणातील महिलांचे उपविजेतपद महाराष्ट्राने संपादन केले. तसेच, बीच पेंचक सिलट स्पर्धेत २ रौप्य व १ कांस्यपदक महाराष्ट्राच्या नावापुढे झळकली. बीच कबड्डी दोन्ही संघाना तर बीच सॉकरमध्ये पुरूष संघाला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

## राज्यस्तरीय स्पर्धेत मुंबई दमदार

**मुंबई :** विभागीय क्रीडा संकुलामध्ये दि.३ व ४ जानेवारी राज्यस्तरीय शास्त्रंग मार्शल आर्ट्सचे आयोजन करण्यात आले होते. राज्य संघटनेचे सचिव मिलिंद काटमोरे यांच्या नियोजनाखाली या स्पर्धेत राज्यभरातून ६०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. उच्च दर्जाच्या लढती, शिस्तबद्ध आयोजन आणि खेळाडूंच्या उत्पृष्ट तंत्रामुळे स्पर्धेला मोठी रंगत आली होती. स्पर्धेत मुंबई जिल्ह्याने दमदार कामगिरी करत विजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. यावेळी मुंबईच्या खेळाडूंनी तब्बल ४८ सुवर्ण, १३ रौप्य आणि १ कांस्यपदक पटकावत प्रथम क्रमांक पटकावला आहे.



## तेलंगणात रंगला महारणसंग्राम

**। तेलंगणा । क्रीडा प्रतिनिधी ।**

भारतीय खो-खो महासंघाच्या मान्यतेने तेलंगणा खो-खो असोसिएशन आयोजित ५८ व्या वरिष्ठ राष्ट्रीय खो-खो चॅम्पियनशिप स्पर्धा येथील रेल्वे ग्राऊंडवर सुरू आहेत. या स्पर्धेत महिला आणि पुरुष गटातील सामन्यांनी चांगलीच रंगत आणली. महिलांमध्ये तेलंगणा व आसाम, तर पुरुषांमध्ये विदर्भ व हरियाणा संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर मोठ्या फरकाने मात करत आपले वर्चस्व ठसठशीतपणे सिद्ध केले.

यजमान तेलंगणा संघाने महिला गटातील लढतीत ऑल इंडिया पोलिसचा २८८ असा एक डाव २० गुणांनी सहज पराभव करत गटात पहिला विजय नोंदवला. तेलंगणाकडून अखिला आणि अनुषा के. यांनी सलग दमदार कामगिरी नोंदवत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला आणि प्रेक्षकांची दाद मिळवली. दुसऱ्या सामन्यात आसामने जम्मू-काश्मीरचा एक डाव २० गुणांनी (२८८) सहज पराभव केला. आसामकडून रांजणा आणि कल्याणी यांनी भक्कम संरक्षण करत संघाच्या विजयाची पायाभरणी केली. आणखी एका सामन्यात मध्यभारत संघाने बिहारचा एक डाव ३६ गुणांनी (४०४) धुव्वा उडवला. मध्यभारतकडून रोहिणी आणि ईरा भट्ट यांनी अप्रतिम खेळ करत सामन्यावर संपूर्ण वर्चस्व गाजवले.

पुरुष गटात विदर्भ संघाने आक्रमक आणि शिस्तबद्ध खेळ करत गोव्याचा ३८-४ असा ३४ गुण व एक डाव राखून धुव्वा उडवला. विदर्भकडून दिलराज सिंग याने आक्रमणात आघाडी घेतली.

फैजल खान याने संयमी खेळ करत संघाच्या मोठ्या विजयात भर घातली. दुसऱ्या पुरुष सामन्यात हरयाणाने हिमाचल प्रदेशचा ३४-२४ असा १० गुणांनी पराभव केला. मध्यंतराला २ गुणांनी पिछाडीवर (१२-१४) असतानाही हरयाणाने दुसऱ्या डावात आक्रमक खेळ करत २२ गुणांची कमाई केली. हरयाणाकडून ध्रुव आणि गौरव यांनी निर्णायक कामगिरी केली.

तिसऱ्या सामन्यात राजस्थानने चंदिगडचा एक डाव ९ गुणांनी (२५-१६) पराभव केला. राजस्थानकडून मनिष आणि हरिष यांनी संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली.

### थरार, चपळाई, इतिहासनिर्मितीचा संगम | ज्ञानविकास विद्यालयाची ऐतिहासिक बाजी

# अमर हिंद मैदानावर 'खो-खो'चा महायज्ञ

**। मुंबई । क्रीडा प्रतिनिधी ।**

कै. उमेश शेणॉय यांच्या स्मरणार्थ दादरच्या अमर हिंद मंडळाच्या मैदानावर आंतरशालेय खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मातीत धुळीचे लोट उडवत, श्वास रोखून धरायला लावणाऱ्या पकडी, सेकंदाच्या फरकाने दिलेल्या हुलकावण्या आणि प्रत्येक क्षणाला उत्कंठा वाढवणाऱ्या या खो-खो स्पर्धेने अक्षरशः क्रीडाप्रेमींना वेड लावले होते. या स्पर्धेत मुंबई, उपनगर व ठाण्यातील २७ शाळांनी सहभाग नोंदवला होता. प्रत्येक सामना म्हणजे जिद्दीची चाचणी आणि कौशल्याची कसोटी ठरली. अमर हिंद मंडळाच्या मैदानावर रंगलेली ही स्पर्धा म्हणजे खो-खोच्या परंपरेचा



उत्सव, नव्या पिढीच्या जिद्दीचा जल्लोष आणि दादरच्या क्रीडा संस्कृतीला मिळालेले नवे बळ असा अविस्मरणीय ठसा उमटवून गेली.

या स्पर्धेचे उद्घाटन अमर हिंद मंडळाचे माजी राज्यस्तरीय व विद्यापीठीय खेळाडू अमित चिखलकर यांच्या हस्ते झाले. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी खेळाडूंमध्ये नवी ऊर्जा संचारली. स्पर्धेत १२ मुलींचे व १५ मुलांचे संघ विजयाच्या ध्यासाने मैदानात उतरले होते. यावेळी मुलींच्या अंतिम सामन्यात कोपरखैरणे येथील रा.फ. नाईक विद्यालय विरुद्ध ठाण्यातील ज्ञानविकास विद्यालय यांच्यात चुरशीची लढत झाली. रा. फ. नाईकने ९-५ असा १ डाव राखून ४ गुणांनी दणदणीत विजय मिळवला. श्रुती चोरमारे (४ मि. संरक्षण व ३ गुण) वैष्णवी जाधव (४ मि. संरक्षण व ३ गुण), प्रणिती जगदाळे (२.३० मि. संरक्षण १ गुण) अशी सलग व ठोस कामगिरी नोंदली. पराभूत ज्ञानविकासकडून समृद्धी कदम (१.३० मि. संरक्षण व १ गुण), प्रांजल पाटे (१.३० मि. संरक्षण व १ गुण), श्रावणी मोरे (१.३० मि. संरक्षण व २ गुण) यांनी झुंज दिली; मात्र रा. फ. नाईकच्या आक्रमणापुढे त्यांचा निभाव लागला नाही.

मुलांच्या अंतिम सामन्यात ठाण्याच्या ज्ञानविकास विद्यालय संघाने वांद्रे येथील महात्मा गांधी विद्यामंदिर वांद्रे संघावर १०-७ असा १ डाव राखून ३ गुणांनी विजय मिळवला. ज्ञानविकासच्या साहिल शिंदे (२.२० मि. संरक्षण व २ गुण), विनायक भणगे (३.५० मि. संरक्षण व १ गुण), साईराज बैकर (२.१० मि. संरक्षण व २ गुण), सार्थक वांगडे (३.५० मि. संरक्षण व १ गुण) अशी निर्णायक कामगिरी नोंदवली. तर पराभूत महात्मा गांधी विद्यामंदिरच्या तन्मय पूजारे (१ मि. संरक्षण व २ गुण), बाळकृष्ण हरळे (१.४० व १.१० मि. संरक्षण), संदेश गोमणी (१.३० मि. संरक्षण व १ गुण) यांनी दिलेला लढा कौतुकास्पद ठरला.

तसेच, मुलींच्या गटात रा.फ. नाईक विद्यालयाची सर्वोत्कृष्ट अष्टपै श्रुती चोरमारे, सर्वोत्कृष्ट संरक्षक वैष्णवी जाधव, ज्ञानविकास विद्यामंदिराची सर्वोत्कृष्ट आक्रमक श्रावणी मोरे यांना गौरविण्यात आले. तर, मुलांच्या गटात ज्ञानविकास विद्यामंदिरचा सर्वोत्कृष्ट अष्टपैलू साहिल शिंदे, सर्वोत्कृष्ट संरक्षक विनायक भणगे व महात्मा गांधी विद्यालयाचा सर्वोत्कृष्ट आक्रमक तन्मय पूजारे यांना गौरविण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून अमर हिंद मंडळाच्या राष्ट्रीय खो-खो खेळाडू निलिमा पारकर उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते विजेत्या संघांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अरुण देशपांडे, सीमा कोल्हटकर, विजय राणे, राजेंद्र कर्णिक, प्रफुल्ल पाटील, उत्कर्षा शेणॉयतळेकर, अमित किंबहुने, निलेश सावंत, रोहन चव्हाण यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)